

# श्री साईलीला

जुलै        कि. ५० पैसे        १९७०

# या अंकांत—


१ शिरडीचें वाढते वैभव ( संपादकीय )
२ श्रीसाईबाबांच्या उद्बोधक आठवणी
३ श्रीगुळवणी महाराजांचा सिद्धयोग
४ श्रीनामदेवांचीं पंजाबांतील स्मृतिमंदिरें
५ साक्षात्कार
६ ही बाबांची कृपादृष्टि
७ मुंडकोपनिषद् आणि विज्ञान
८ गीतेचें सारभूत मार्गदर्शन
९ माझा एक दिव्य अनुभव
१० श्रीसद्गुरु साईनाथ महाराज यांचा पोवाडा
११ श्रीरामनवमी उत्सव, शिरडीवृत्त वगैरे



# श्री सा ई वा क्सु धा

बाबांच्या मुखावाटे जे जे शब्द बाहेर पडत ते ब्रह्मलिखिताप्रमाणें असत. त्यांतलें एकही अक्षर व्यर्थ नसे. योग्य वेळीं त्यांची वाणी आपलें कार्य पार पाडीत असे. संत दास गणू यांची अशी दृढ निष्ठा होती. जशी भावना तसें फळ, जसा विश्वास तसें बळ. बाबा ज्ञानियांचे मुकुट मणी होते. त्यांची वाणी कधींही मिथ्या व्हायची नाहीं. आपल्या भक्ताचें कोड पुरवायचें हेंच त्यांचें ब्रीद होतें.

—श्रीसाईसच्चरित

---


श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक. ]

वर्ष ४९ वें ] जुलै १९७० [ अंक ४ था

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४

## ❀ संपादकीय ❀

# शिरडीचें वाढतें वैभव

**प्रिय वाचक—**

श्रीसाईबाबांच्या वास्तव्यानें पुण्यपावन झालेली पुण्यधाम शिरडी वर्षानुवर्षें उत्तरोत्तर वैभवशाली बनू लागली आहे. बाबा शिरडींत प्रथम आले त्याकाळची शिरडी, बाबांचें शिरडींत ४|५ तपें वास्तव्य झालें त्या काळांत प्रगतिपथावर असलेली शिरडी, बाबा समाधिस्थ झाल्यानंतर गेल्या पन्नास वर्षांत क्रमाक्रमानें वाढत, सुधारत गेलेली शिरडी व अलीकडच्या ४|६ वर्षांच्या काळांत नवनवीन सुखसोयींनीं नि सुधारणांनीं सुसंपन्नतेचा मार्ग आक्रमण करणारी शिरडी, हीं शिरडीक्षेत्राचीं विविध स्वरूपें पाहिलीं म्हणजे कोणालाही आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय रहाणार नाहीं.

शिरडी येथें बाबांचें वास्तव्य असलेल्या काळांत त्यानीं गरीब, श्रीमंत, जात-गोत वगैरे कशाचाही भेदभाव न बाळगतां लोककल्याणाचें, लोकांना सुखी करून त्यांना चिंतामुक्त करण्याचें जसें कार्य केलें, त्याहीपेक्षां अधिक प्रभावी, अधिक कल्याणकारी व अधिक प्रभावशाली कार्य आजकाल बाबांच्या मागें निश्चितपणें चालू आहे.

माझ्यामागें माझी समाधि तुमच्याशीं बोलेल. तुमच्या दुःखांचें व संकटांचें निवारण करील. तुम्हीं श्रद्धायुक्त अंतःकरणानें मला हांक मारा, तुमच्या हांकेसरसा मी तुमच्या पाठीशीं उभा आहे, असें बाबांनीं आपल्या भक्तांना आश्वासन दिलें होतें तें पोकळ आश्वासन नव्हतें. तें पूर्ण केलें जात असल्याचा अनुभव आजकाल बाबांच्या भक्तांस येत आहे. या आमच्या म्हणण्यास प्रत्येक भक्ताचा पाठिंबा मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं.

आणि त्याचा इष्ट परिणाम काय घडून आला आहे ? आजकाल निरनिराळ्या भागांतून येणाऱ्या भक्तांनीं शिरडी क्षेत्र फुलून जात आहे. त्यांच्या सुखसोयीसाठीं संस्थानतर्फे नाना प्रकारच्या व आवश्यक त्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. संस्थानला सामर्थ्य देणारे, खंबीर बनविणारे व कार्यप्रवृत्त करणारे कोण ? बाबांचे भक्तच.

बाबा आपल्या भक्तांना वेळोवेळी प्रेरणा देऊन त्यांच्याकडून व संस्थानकडून जनतेची सेवा करवून घेत आहेत. ही सारी बाबांच्या कृपेची किमया आहे.

शिरडींतील सुधारणा सत्र अखंड चालू आहे; परंतु गेल्या एकदीड महिन्यांतील २।३ घटनांचा येथें ओझरता उल्लेख केल्याशिवाय रहावत नाहीं.

बाबांचे एक पारशी भक्त कांहीं दिवसांपूर्वी बाबांच्या दर्शनानिमित्त शिरडींत येऊन गेले. त्यानीं तेथें ८।९ एकर जमीन संस्थानच्या परिसरांत खरेदी करून ती संस्थानच्या स्वाधीन केली व त्या भूमीवर एक सुंदर व जरूर त्या सुखसोयींनीं सुसज्ज असें मंगल-धाम बांधण्यासाठीं ८० हजार रुपयांची देणगी दिली. त्या मंगल धामाचा उपयोग लग्नकार्य किंवा इतर मंगल कार्यें, सभासंमेलनें वगैरेसाठीं व्हावयाचा आहे. हें मंगलधाम उभारण्याचें कार्य सुरू झालें आहे.

साईबाबांच्या कृपेनें शिरडींत या पूर्वींच सर्व सुखसोयींनीं व उपकरणांनी सुसज्ज असें हॉस्पिटल सुरू झालें आहे. तेथें बालकांच्या रोगांवर इलाज करण्यासाठीं स्वतंत्र विभाग जोडण्यांत आलेला आहे. तो यापूर्वी होता; परंतु असावा तसा कार्यक्षम नव्हता. आतां तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ति झाल्यामुळें व आठवड्यांतील ठराविक दिवशीं तज्ज्ञ डॉक्टरांचा सहकार मिळण्याची सोय करण्यांत आल्यामुळें त्या विभागाची उपयुक्तता अनंत पटीनीं वृद्धिंगत झालेली आहे.

खेड्यापाड्यांतून बालमृत्यूंचें प्रमाण नेहमीं वाढत्या प्रमाणांत असतें. याचें एक प्रमुख कारण म्हणजे योग्य वेळीं योग्य औषधोपचारांचा व जरुर त्या निगेचा अभाव हें होय. शिरडींत हें जें बालरोग निवारण कार्य सुरू झालें आहे त्याचा फायदा केवळ शिरडींतीलच नव्हे तर आसपासच्या खेड्यांचा व तेथें सतत मुलांबाळांसह येणाऱ्या भक्तवृंदांचा अमाप फायदा होणार आहे व एक मोठी अडचण दूर होणार आहे.

अशा प्रकारच्या अनेकविध सुखसोयींमुळें शिरडीचें वैभव, शिरडीचें सौंदर्य व शिरडीची उपयुक्तता उत्तरोत्तर वाढत आहे. तें केवळ भक्तांच्याच नव्हे तर प्रवाशी लोकांच्या दृष्टीनेंही एक प्रेक्षणीय स्थळ होऊं लागलें आहे. आणि त्यामुळें महाराष्ट्रांतील प्रेक्षणीय स्थळांत त्यांची गणना न झाली तरच नवल ! त्यामुळें तेथें लौकरच इतर स्थळांप्रमाणें 'टुरिस्ट सेंटर' स्थापन केला जावा, या दृष्टीनें हालचाली सध्या सुरू आहेत.

शिरडीच्या वाट्यास ही जी वाढती वैभवसंपन्नता येत आहे ती केवळ श्रीसाईबाबांची कृपा होय. त्यांच्या मनांत आल्यावर ते काय करूं शकणार नाहींत ? तेव्हां त्यांना आमचें त्रिवार वंदन.


—संपादक.

# श्री साईबाबांच्या उद्‌बोधक आठवणी

## कथनकार — श्री. बाळासाहेब रेगे

**लेखक : श्री. आप्पाराव**

इंदूर येथील हायकोर्टाचे सेवानिवृत्त सरन्यायाधीश श्री. एम्. बी. ऊर्फ बाळासाहेब रेगे हे श्रीसाईबाबांचा सहवास लाभलेले. त्यानीं प्रथमपासून आपलें




'लेकरू' मानलेले व त्यांच्या कृपाप्रसादास पात्र असलेले बाबांचे एक थोर व निष्ठावान् भक्त आहेत. बाबांच्या निकट सहवासांत दीर्घकाळ आलेले त्यांच्यासारखे निष्ठावान् भक्त आतां जवळ जवळ दुर्मिळ झाले आहेत, म्हणून यांचें महत्त्व. आतां त्यांचें वय (८२) वर्षे झालेलें असलें तरी त्यांची स्मरणशक्ति प्रखर आहे. स्वतःसंबंधीं सहसा बोलूं नये असा बाबानीं त्याकाळीं त्यांना दंडक घालून दिला व त्यामुळें ते गेलीं कित्येत वर्षे फारसे कोणाला माहीत नव्हते. विशेषतः मद्रास प्रांतांत व या देशाच्या इतर भागांत श्रीसाईबाबा व त्यांचा संदेश याचा प्रचार ज्यानीं लोकल्याणाच्या हेतूनें केला ते बॅ. नरसिंहस्वामी यानीं त्यांच्या सतत मागें लागून, या नाहीं त्या मार्गानें, त्यांच्या कांहीं आठवणी मिळवून व त्यांत इतर मार्गांनीं मिळविलेल्या माहितीची भर

घालून श्रीसाईबाबांच्या आठवणींचें एक, सुंदर पुस्तक इंग्रजीत प्रसिद्ध केलें. श्री नरसिंह स्वामी हे बाबासंबंधीं माहिती जमवीत असतां ज्याच्या ज्याच्यापाशीं गेले त्यानीं त्याना आपल्याजवळ असलेली माहिती आतुरतेनें दिली. ते श्री. रेगे त्यांना भेटले. तेव्हा त्यानीं कोणत्याही प्रकारें आतुरता तर दाखविली नाहींच परंतु उलट म्हणाले. "खरं सांगू तुम्हांला ? माझ्या पाशीं सांगण्यासारखें कांहीं नाहीं ! मग सांगू काय ?"

## खरा जातिवंत भक्त

श्रीनरसिंह स्वामीना माणसांची पारख होती. त्यानीं ओळखलें कीं, खरा जातिवंत भक्त येथें आहे. यांचा पिच्छा आपण सोडतां कामा नये.



पुणें येथें या दोघांची पहिली भेट झाली. एकदां श्री. रेगे व त्यांचे एक स्नेही यांस एका गृहस्थानें आपल्या घरीं बोलावलें. श्रीनरसिंहस्वामी यांस हें समजलें. ते दोघे आमंत्रणाप्रमाणें जायला निघाले. तेव्हां हातीं कमंडलू घेऊन तेही त्यांच्यामागून निघाले !

आपल्यामागून नरसिंहस्वामी येत असल्याचें पाहून श्री. रेगे म्हणाले, "अहो ! आमच्या मागून तुम्हीं कुठं निघालांत ? आम्हीं आमंत्रणावरून जात आहोंत !"

"मला नसेना का आमंत्रण ! मी माझ्या धन्यामागून कुत्र्यासारखा चाललों आहे ! धन्याच्या पाठोपाठ जाणें हें कुत्र्याचें कर्तव्य नाहीं का ? आंत प्रवेश मिळाला तर आंत जाऊन धन्याच्या पायांजवळ बसेन, नाहीं तर दरवाज्याबाहेर त्यांची वाट पहात बसेन !"

नरसिंहस्वामींची ही वृत्ति व चिकाटी पाहून श्री. रेगे थक्क झाले. त्यांचा निरुपाय झाला. त्यानी त्यास आपल्याबरोबर आपल्या मित्राकडे नेलें. तेथें श्रीसाईबाबांच्या आठवणी निघाल्या. तेथील सारा संवाद नरसिंहस्वामीनीं आपल्य

मनांत टिपून ठेविला. नंतर निवासस्थानी गेल्यावर स्वामीजींनीं ऐकलेल्या आठवणी टाईप केल्या व टाईप केलेले कागद श्री. रेगे यांच्यापुढें आणून ठेविले !

श्रीनरसिंहस्वामींनीं अशा रीतीनें युक्तिप्रयुक्तीनें श्री. रेगे यांच्याकडून श्रीसाईबाबासंबंधीं जितकी माहिती मिळवितां येईल तेवढी मिळविली.

**श्रीनरसिंहस्वामींची कामगिरी**

श्रीसाईबाबांच्या शिकवणुकीचा लोककल्याणासाठी प्रसार झाला पाहिजे असें त्याना तीव्रतेनें वाटत असे. त्या हेतूनें त्यानी अखिल भारतीय साईसमाज या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचें श्रीसाईभक्तिप्रचाराचें कार्य उत्तरोत्तर वाढत्या जोमानें नि उत्साहानें चालू आहे.

सुमारे दोन वर्षांपूर्वी मद्रास येथे या समाजातर्फे साई समाजाचा वार्षिक महोत्सव मोठ्या थाटांत साजरा करण्यांत आला. त्यावेळी तिकडील भक्तवृंदानें श्री. बाळासाहेब रेगे यांस समारंभातील मुख्य पाहुणे या नात्याने खास आमंत्रणाने सन्मानपूर्वक पाचारण केले होते. बाबा ज्यांना आपले 'लेकरू' मानीत असत, ज्यांच्यावर बाबांची पूर्ण कृपादृष्टि होती नि आहे व साई समाजाचे आद्य संस्थापक श्रीनरसिंह स्वामी हे त्यांना बाबाप्रमाणें पूज्य मानीत असत. त्यांच्या आगमनामुळे तिकडील भक्तमंडळीत अपरंपार उत्साह निर्माण झाला होता. ती सारी भक्तमंडळी त्यांना 'श्रीरेगे महाराज' या आदरणीय नावाने संबोधीत असत. तेथे त्यांची पूजा व सन्मान करण्यांत आला.

कांही महिन्यापूर्वी मद्रास येथील साई समाजातर्फे शिरडी, नाशिक, पंढरपूरसारख्या पवित्र स्थानांस भेट देऊन पुण्यपावन होण्यासाठी श्रीसाईभक्तांची एक 'यात्रा स्पेशल' निघाली होती. त्यांत सुमारे ४०।५० भक्तमंडळी सामील झाली होती. पवित्र स्थानांस भेट देत देत ही भक्तमंडळी रेगे महाराजांचे दर्शन घडावे या हेतूनें इंदूरलाही गेली होती.

दोन वर्षांपूर्वी साईबाबांच्या पर्याणाचा सुवर्ण महोत्सव शिरडी व मुंबई येथे मोठ्या समारोहाने साजरा करण्यांत आला. त्यापैकी मुंबईतील उत्सवाच्या प्रमुखपदी त्यांची योजना करण्यांत आली होती.

एवढ्यावरून श्री. बाळासाहेब रेगे यांचे श्रीसाईबाबांच्या भक्तमंडळीत किती महत्त्वाचें स्थान आहे, याची आमच्या वाचकांस कल्पना करतां येईल.

त्यांचा व त्यांच्या कांहीं विचारांचा अल्पांशानें परिचय यापूर्वी सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी विशेषांकांत (ऑक्टोबर १९६८) करून देण्यांत आलेला आहे.

## श्री. बाळासाहेब रेगे यांची भेट

ही एवढी प्रस्तावना करण्याचें कारण श्री. बाळासाहेब रेगे हे गेल्या महिन्यांत औषधोपचारासाठीं मुंबईंत आले असतां त्यांची भेट घेऊन त्यांच्याशीं बोलण्याची संधी आम्हांला मिळाली. त्यांच्याशीं आमचा जो संबाद झाला त्याचा फायदा आमच्या वाचकांसही व्हावा या हेतूनें त्याचें थोडक्यांत सार येथें देण्यांत येत आहे.

"साईबाबांचें दर्शन घेण्याचा लाभ आपल्या आयुष्यांत कधीं व कशा-रीतीनें घडून आला तें सांगाल का?"

"त्याचें असें झालें. तें १९१० साल होतें. मी त्यावेळीं वांद्रे येथें राहून मुंबईत एल्.एल्.बी. च्या टर्मस् भरीत होतों. माझा देवधर्माकडे ओढा होता. एकदां मला एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत प्रथम मला आमची कुलदेवता व श्रीविष्णु यांचें दर्शन घडलें. पुन्हां एकवार स्वप्न पडलें त्यावेळीं कुलदेवता श्रीविष्णु व साईबाबा यांचें दर्शन मला घडलें. यांच्याकडे बोट दाखवून देवता मला म्हणाली "हे कोण आहेत, ओळखलें का? हें माझेंच स्वरूप आहे. हें आणि आम्हीं एकच आहोंत, तेथें दुजेपणा नाहीं. तिसऱ्यावेळीं स्वप्न पडलें तेव्हां मी उंच आकाशांत उड्डाण करीत करीत एका गावांत उतरलों. तो गांव म्हणजे साईबाबांची शिरडी होती! स्वप्नांत पाहिलेले साईबाबा मला तेथें दृष्टीस पडले.

## बाबांच्या दर्शनाची इच्छा

स्वप्नांत साईबाबांचें दर्शन घडतांच मी त्यांना नमस्कार करण्यासाठीं खालीं वाकलों तेव्हा ते मला म्हणाले, "नका; नमस्कार करूं नका. मी तुमचा ऋणकरी आहें."

असें म्हणून ते मला नमस्कार करूं लागले व मीही नमस्कार करूं लागलों. असा प्रकार कांहीं वेळ चालल्यावर बाबा मला म्हणाले, "अरे! मी किती दिवस तुझी वाट पहात आहें! जा! साठ्यांच्या वाड्यांत जाऊन बैस!"

त्याप्रमाणें मी साठ्यांच्या वाड्यांत गेलों. (स्वप्नांत) तेथें थोडा वेळ बसलों.

नंतर आजूबाजूला जाऊन सर्व बारकाईनें पाहिलें. निंबाचें झाड पाहिलें. बाबांचा भक्त मेघा एका पायावर उभा राहून प्रार्थना करीत होता. तेंही दृश्य पाहिलें.

आणि त्यानंतर मला तीव्रतेनें वाटूं लागलें कीं आपण शिरडीस जाऊन बाबांचें दर्शन घेतलें पाहिजे.

माझ्या शेजारी श्री. रघुनाथराव तेंडुलकर तसेंच श्री. मानकर या नावाचे गृहस्थ रहात असत. आम्ही तिघानींही शिर्डीस जाण्याचें ठरवून त्याप्रमाणे गेलों. बाबांच्या दर्शनासाठीं प्रथम मी मशिदींत गेलों. त्याकाळीं मशीद म्हणजे एक मोडकळीस आलेली जागा होती. तेथें सारवलेल्या जमिनींत खड्डे पडलेले होते. बाबा तेथें एका गोणपाटाच्या तुकड्यावर बसलेले असत. आतां त्या स्थानाला सौंदर्य व व्यवस्थितपणा प्राप्त झालेला आहे, त्या स्थानाला आतां द्वारकामाई म्हणतात.

## माणसाकडे कशाला आलास ?

मी तत्पूर्वी कोणाच्याही दर्शनास जात नसें. माणसाकडे जाऊन त्याचा काय उपयोग ? देवाची भक्ति करावी अशा प्रकारचे विचार माझ्या मनांत घोळत असत.

त्या विचारांची जाणीव बाबांना झाली असावी.

मीं त्यांच्या भेटीस गेलों तेव्हां ते मला म्हणाले, "येथें माणसाकडे कशाला आलास ? मी काय तुझं देणं लागतों ! चालता हो येथून !"

बाबांचे ते शब्द ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला व वाईटही वाटलें. मी अगदीं बेचैन मनःस्थितींत तेथून निघालों. परंतु या सत्पुरुषाची पाठ आपण सोडतां कामा नये असें मनाला वाटूं लागलें.

## बाळ आलास. ये !

पुन्हां दुपारीं त्यांना भेटावें म्हणून मी मशिदींत गेलों तेव्हां बाबा एकटेच खालीं मान घालून बसले होते. मी हळू हळू पावलें टाकीत त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिलों तेव्हां वर मान करून बाबांनीं माझ्याकडे पाहिले आणि म्हणाले, "ये ! ये ! बाळ ! सकाळीं मी तुला बोललों म्हणून वाईट वाटलं का तुला ? घरांत वडीलधारीं माणसें असतात तीं कोणाशीं तरी बोलतांना जवळ घरांतील लहान मूल आलें म्हणजे त्याच्या अंगावर ओरडतात नाहीं का ? तसं तूं माझें लेकरूं आहेस ! वाईट वाटून घेऊ नकोस बरं !

त्या प्रेमळ बोलण्यानें माझ्या मनाचें समाधान झालें. मन उत्तेजित झालें.

मी तेथें असतां एके दिवशीं बाबा आपला सकाळचा कार्यक्रम आटोपून येत होते. माझ्याजवळ कॅमेरा होता. ते येत असतां फोकस लावून मी त्यांचे फोटो घेऊं लागलों. बाबा हां हां म्हणतां माझ्यां अगदीं जवळ आले. व पुन्हां त्यावेळींही मला फार बोलले. शिव्याही घातल्या! तें बोलणें असह्य होऊन मी तेथल्या तेथें चक्कर येऊन खालीं कोसळणार तोंच पडतां पडतां जवळच्या लोकांनी मला सावरून धरलें.

## मी पेटींत मावणार नाहीं !

आणि त्यानंतर पुन्हां त्यांच्या भेटीस गेलों तेव्हां मला प्रेमाने जवळ घेऊन व पाठीवरून हात फिरवीत बाबा म्हणाले "बाळ ! वाईट वाटलं का तुला ? मी त्या पेटींत मावेन असं का वाटलं तुला ? मला फोटोंत पहाणार तूं! छे; छे; मध्ये जी भिंत आड आली आहे ती पाडून टाक; म्हणजे मी तुला दिसेन !"

या प्रसंगानंतर बाबांचें सान्निध्य अधून मधून मला सतत नऊ वर्षे लाभलें. परंतु त्या कालावधींत बाबांच्या शिव्या खाण्याचा प्रसंग माझ्यावर कधीही आला नाहीं.

एकेका प्रसंगाच्या निमित्तानें मला सहसा समजूं न देतां बाबांनीं मला मार्गास लाविलें.

आपण एखाद्या धार्मिक ग्रंथाचें वाचन केले पाहिजे, या विचाराने ज्ञानेश्वरीचें वाचन करण्याचा विचार माझ्या मनांत घोळूं लागला.

बाबांच्या लक्षांत माझी ही मनःस्थिति आली असावी. एकदां मी त्यांच्या जवळ जाऊन बसलों असतां ते मला म्हणाले– "ज्ञानेश्वरीचे वाचन करणार आहेस काय ? कांहीं वाचण्याची जरूरी नाहीं. वाचनाने डोक्यांत भ्रम उत्पन्न होतो. मनांत शंकाकुशंका येऊं लागतात. त्या साठ्यांच्या वाड्यांत जाऊन काय चाललंय ते जाऊन पहा !"

त्याप्रमाणे मी वाड्यांत गेलों आणि पहातों तर काय ? तेथे तीन विद्वान हातांत ज्ञानेश्वरी घेऊन मारे जोरात वादविवाद करीत होते. त्यांपैकी एकाच्या हातांत होती साखरेबुवांची ज्ञानेश्वरी, दुसऱ्याच्या हातांत अण्णा कुंट्यांची ज्ञानेश्वरी व तिसऱ्याच्या हातींत होती माडगांवकरांची ज्ञानदेवी. तिघेही त्या

ग्रंथांच्या आधारे एकेका ओवीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत होते. वाद चालला होता ; परंतु एकवाक्यता कांही होत नव्हती !

### वाड्यांत काय पाहिलंस ?

तेथून मी बाबांकडे गेलों. त्यानीं विचारलं, "वाड्यांत जाऊन काय पाहिलंस ?"

मी पाहिलेलं व ऐकलेलं आठवलं तसं सांगितलें.

त्यावर बाबा म्हणाले, "अशा वाचनाचा काय बरं उपयोग ?"

तेव्हांपासून मी कमीत कमी वाचायचं नि कमीत कमी बोलायचं, असा निर्धार केला व तसा वागूं लागलों. त्या वागण्यात आजही बदल झालेला नाहीं.

एकदां ( १९२२ ) संत माधवनाथ महाराज इंदूरला आले होते. ते आले म्हणजे त्यांच्या दर्शनासाठीं लोकांची गर्दी उसळत असे. ते भारतांत निरनिराळ्या ठिकाणीं संचार करीत असत. कधीं इंदूरला तर कधीं नागपूर, नाशीक, पुणें किंवा इतरत्र कुठें तरी. त्यानीं हिंगणघाट येथें १९३६ सालीं समाधी घेतली.

### माधवनाथ महाराजांची भेट

मी त्यांच्या दर्शनास गेलों तेव्हां त्यांच्या परिचयाचे डॉ. गोसावी हे माझ्याजवळ बसले होते.

प्रथमदर्शनीं मी साईबाबांना पहात आहें असें मला वाटलें. डॉ. गोसावी यानीं त्यांना माझा परिचय करून देतांना माझी नोकरी गेल्याचा उल्लेख केला. ( कारण मला सेवानिवृत्त व्हावें लागले होतें ! ) त्यावर महाराज म्हणाले नोकरी जाते कुठें ? ती चालू आहे ! मी यापुढे वकिली सुरू करणार आहें असें सांगतांच ते म्हणाले "फार चांगलें ! तुम्हीं वकील आणि मी बॅरिस्टर !

माझी वकीली नंतर फार चांगली चालूं लागली. पूर्वीं मला पगार मिळत असे त्याच्या चौपट पैसे आतां मला मिळूं लागले.

त्यानीं मला गीतेचा पंधरावा अध्याय वाचीत जा, म्हणून सांगितलें. मी एका मित्राकडून तो अध्याय चारदां वाचून घेतला आणि नंतर तो मला तोंडपाठ झाला.

### म्हाळसापतींची आठवण

साईबाबा शिरडींत आले तेव्हां ते गांवाबाहेरील खंडोबा देवालयाच्या

पटांगणांत उभे होते. त्या मंदिराचे पुजारी म्हाळसापती यानीं सर्वप्रथम पुढें जाऊन त्यांचें स्वागत केलें व त्यांना "आवो साईबाबा!" असें पुकारलें. त्यानंतर म्हाळसापती बाबांचे परम भक्त झाले ते अगदीं शेवटपर्यंत.

त्यांच्यासंबंधीं बोलतांना श्री. बाळासाहेब रेगे म्हणाले, " म्हाळसापती हे बाबांचे अगदीं एकनिष्ठ भक्त होते. त्यानीं त्यांच्या भक्तीशिवाय बाबांकडून कशाचीही अपेक्षा केली नाहीं. बाबा आपल्या जवळच्या माणसांपैकीं पुष्कळांस कांहींना कांहीं पैसे उचलून नित्य नियमानें देत असत. परंतु म्हाळसापतीस त्यानी कधीं पैसे उचलून दिले नाहींत. त्यांना शेवटपर्यंत गरीबींत ठेविलें !

बाबा समाधिस्थ झाल्यानंतर १९१९ सालीं मी शिरडीस गेलों असतां म्हाळसापतींची सहज भेटगांठ झाली. त्यांना आपण कांहीं तरी द्यावें अशी मला बुद्धि झाली. खिशांतून दहा रुपये काढले आणि मी त्यांच्या हातावर ठेविले, ते त्यानीं घेतले आणि त्यांच्या नेत्रांवाटे अश्रुप्रवाह सुरू झाला. सद्गदित कंठानें ते मला म्हणाले, " माझे बाबा मला सोडून कुठें गेलेले नाहींत. ते माझ्याजवळच आहेत. ते माझ्या अडचणी जाणतात. आज माझ्या वडिलांचें श्राद्ध ! आमच्या पुरोहितानें मी सारें श्राद्धकर्म दहा रुपयांत आटपून दाखवितों असें सांगितलें होतें; परंतु ते तरी द्यायला माझ्याजवळ होते कुठें ? बाबांनीं तुम्हाला प्रेरणा दिली आणि नेमके तेवढेच रुपये तुम्हीं माझ्या हातावर ठेविले ! "

( या मुलाखतीचा दुसरा हप्ता पुढील अंकीं )

# श्रीगुळवणी महाराजांचा सिद्धयोग

लेखक : द. सा. मांजरेकर, चेंबूर

"गुरुदेवानीं आज ८५ व्या वर्षामध्यें पदार्पण केलें आहे; पण याही दिवसांमध्यें आपल्या असंख्य शिष्यांच्या साधनेवर त्यांची नजर आहे. प्रत्येकाच्या साधनेकडे आणि प्रापंचिक अडचणींकडे ते जातीनें लक्ष पुरवितात.....आम्हां सर्वांना वाटतें कीं, श्रीगुरुमाउलीपाशीं आलों कीं आम्हीं आमच्या माउलीच्या कुशींतच आलों !"

प. पू. श्रीगुळवणी महाराजांचें चरित्र लिहिण्याचा हा प्रयत्न नव्हे. त्यांचें चरित्र ज्या ठिकाणीं मुळांत आम्ही जाणूं शकलों नाहीं तेथे तें दुसऱ्यांना सांगण्याचा प्रश्नच कुठें येतो ! कोणीसें म्हटलें आहे कीं सामान्यांच्या बुद्धीची मर्यादा जेथें संपते तेथूनच सत्पुरुषांच्या चरित्राला प्रारंभ होत असतो. त्यामुळें सत्पुरुषांची चरित्रें सामान्यांना अनाकलनीयच असणार. तरीसुद्धा त्यांच्या चरित्रांपासून सर्वांना सारखीच स्फूर्ति मिळत असते.



वेदकालीन भारतामध्यें जीं नररत्नें होऊन गेलीं त्यांच्याच तोडीचीं नररत्नें आजहि येथें सांपडतील यावर कोणाचा विश्वासच बसणार नाहीं. निदान यापूर्वीं तरी माझा अशा गोष्टींवर विश्वास नव्हता. प. पू. श्रीगुळवणी महाराजांचें नांव प्रथम माझ्या कानांवर आलें तें सन १९६७ सालीं. त्या वर्षी श्रीमहाराजांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त सहस्रचंद्रदर्शनशान्ति याग

व्हायचा होता. त्या निमित्तानें प्रो. केरूर यांचा श्रीमहाराजांचा आणि त्यांच्या शक्तिसंक्रमण योगाचा परिचय करून देणारा एक त्रोटक लेख दैनिक नवशक्तीमध्यें वाचला. आणि वाचून वर्तमान पत्र बाजूला ठेवून दिलें! श्रीगुळवणी महाराज संकल्पानेंच साधकांमधील कुंडलिनी शक्ति जागृत करतात असा उल्लेख त्या लेखामध्यें होता. कुंडलिनी जागृति म्हणजे कांहीं साधीसुधी बाब नव्हे. अध्यात्मामध्यें पराकोटीला पोहोंचलेल्या साक्षात्कारी संत महात्म्यांनाच ही गोष्ट शक्य होती. विसाव्या शतकामध्यें ही गोष्ट घडणेंच शक्य नाहीं. अगदीं अलिकडच्या काळामध्यें भगवान् श्रीरामकृष्णपरमहंसांनीं स्वामी विवेकानंदांची कुंडलिनी शक्ति जागृत केल्याचें वर्णन आहे. पण त्या गोष्टीला आता एक शतकाहून अधिक कालावधि झाला आहे. भगवान् श्रीरामकृष्णांच्या तोडीचा आचार्य अलिकडच्या काळांत निर्माण झाल्याचें माझ्यातरी ऐकिवांत नव्हतें. पण श्रीगुळवणी महाराजांच्या कृपेनें जेव्हां मला प्रत्यक्ष अनुभव आला त्यावेळीं मी भांबावलों, आश्चर्य चकित झालों. "ही तर प्रत्यक्ष शक्ति जागृति! वेदकालीन ऋषिमुनीनीं ज्या दिव्य अनुभूतीचें वर्णन करून ठेवलें आहे तीच ही दिव्य अनुभूति!"

हा वेळ पावेतों श्रीगुरुचरणांच्या दर्शनाचा लाभ घडला नव्हता. तरीसुद्धां दररोज दोन वेळ साधना करीत असतांना त्या स्वर्गीय आनंदाचा उपभोग मी घेतच होतो. साधनेला बसल्याक्षणीच शक्ति माझ्या शरीर-मनाचा ताबा घेऊन माझ्याकडून पुढील साधना करून घेत होती. प. पू. श्रीगुळवणी महाराजांच्या या योगाला "सिद्धयोग" हे नामाभिधान प्राप्त झालें तें याच कारणामुळे की श्रीगुरुदेवांच्या कृपेने एक वेळ जागृत झालेली कुंडलिनी शक्ति साधकाकडून पुढील सर्व साधना स्वतःच करवून घेत असते व श्रीगुरुदेवांच्या शब्दांत– त्या साधकाला या जन्मी अथवा पुढील जन्मांमध्यें पूर्णमुक्ति प्राप्त करून देईपर्यंत ती साधकाच्या सदैव पाठीशीच रहाणार. त्याच्या कडून साधना करून घेणार. शक्तिपात दीक्षा देण्याच्या पद्धतीचे उल्लेख पुराण वाङ्मयामध्यें आढळतात. प्रभू रामचंद्राला गुरुदेव वसिष्ठांनी शक्तिपात दीक्षा देऊन कृतार्थ केलें याबद्दल विश्वामित्र ऋषींनी वसिष्ठांची स्तुति केली आहे. अर्थात अशा तऱ्हेची दैवी देणगी सच्छिष्याला प्राप्त करून देणारे गुरुदेव सुद्धां ईश्वरी कोटीमधीलच असावे लागतात. माझे गुरुदेव प. पू. श्रीगुळवणी महाराज

ईश्वरी कोटीतील आहेत याची मला प्रचीति आली आहे. शक्तिपात दीक्षा होऊन सिद्धयोग प्राप्त झाल्यावर जे विविध अनुभव आम्हांला येतात तेच त्यांच्या ईश्वरत्वाची प्रचीति देतात.

साधनेला बसल्या जागीच साधकाच्या शरीर प्रकृतीप्रमाणे हठयोगांतर्गत विविध आसने आपोआपच साधकाच्या शरीराकडून करवून घेतली जातात. त्याचप्रमाणे विविध बंध, मुद्रा आपोआपच घडतात. आसनांची विविधता येवढी असते कीं त्यांपैकी अनेक आसनांचा हटयोगप्रदीपिकेमध्यें निर्देशहि आढळत नाही. तीच गोष्ट बंध आणि मुद्रा यांची. कांही मुद्रा तर एखाद्या निष्णात नर्तकानें कराव्या त्याप्रमाणे शास्त्रशुद्ध होत असतात.

मिटलेल्या डोळ्यांसमोर विविध प्रकारचे प्रकाश दिसूं लागतात. क्षणाक्षणांमध्यें हे प्रकाश बदलत रहातात व क्षणाक्षणामध्यें या प्रकाशांच्या शलाका एकमेकांमध्यें मिसळून वेगवेगळया आकृति ( Designs ) साधकाच्या आंतरदृष्टीसमोर तयार करतात. कधी कधी अत्यंत तेजस्वी असा वाटाण्याहून थोडा मोठा एक नील बिन्दू दिसतो. त्या भोंवती मग अनेक रंगाच्या प्रकाशाची वलये कंकणासारखी गरगर फिरत असतात. या फिरण्याच्या क्रियेमध्यें कधी केन्द्रस्थानचा प्रकाश बाहेरच्या कंकणांना येतो व बाहेरच्या कंकणांचा प्रकाश केन्द्रस्थानीं चमकूं लागतो. कधी अतिसूक्ष्म असे प्रकाशबिन्दू दृष्टीसमोर तांडव नृत्य करतांना दिसतात.

कित्येक वेळां साधनेमध्यें साधकांच्या तोंडून विविध पशुपक्ष्यांचे आवाज होऊं लागतात. हे आवाज व हठयोग प्रदीपिकेमध्येंहि न आढळणारी आसने ही साधकाच्या अनेक पूर्वजन्मांशी निगडित असतात. जीवाने ज्या ज्या योनीमध्यें या पूर्वीच्या जन्मीं जन्म घेतलेला असतो त्या त्या योनीला अनुरूप अशीं आसनें व आवाज साधकाकडून होत असतात. ही शक्ति जागृत झाल्यावर साधकाच्या सूक्ष्म देहाची सुद्धां केवढी घुसळण करते याची यावरून कल्पना येईल. अशाच साधनेच्या वेळीं कांहीं साधकांना शास्त्रोक्त गायन गातांना मी ऐकलेले आहे. त्यापैकीं कित्येकांना मुळांत शास्त्रीय संगीताचा गंध सुद्धां नाहीं असें मागाहून चौकशी अंतीं कळलें. कांही साधकांना काव्य स्फुरतें व ते नवनवीन काव्यपंक्तींनी श्रीगुरुदेवांची स्तुति करूं लागतात. अशाच एका साधकाची एक उत्स्फूर्त काव्यपंक्ति ऐकून एक कवी आश्चर्याने

म्हणाले, की येवढी वर्षे काव्यशास्त्राचा अभ्यास करून सुद्धा अशा तऱ्हेची एक देखील उत्कृष्ट ओळ आपण अद्याप लिहूं शकलो नाहीं.

येवढी अवघड आसने होत असतांना शरीराला मुळींसुद्धां कष्ट होत नाहींत. मनामध्यें एका अननुभूत आनंदाच्या ऊर्मीवर ऊर्मी येत असतात. या दिव्य आनंदाचा लवलेश विषयानंदामध्यें नसतो याची मागाहून जाणीव होते. या आनंदाबरोबरच श्रीगुरुदेवांबद्दल आणि आपल्या इष्ट देवतेबद्दल एवढी प्रेमभक्ति हृदयामध्यें निर्माण होते कीं त्या प्रेमभक्तीचा आवेग साधकाला आवरता येत नाहीं. पुष्कळदां साधकाच्या शरीराला तो आवेग धारण करतां येत नाहीं आणि मग त्याचें शरीर जमिनीवर कोसळतें, साधक गडबडां लोळूं लागतो, त्याच्या मिटलेल्या डोळ्यांतून आनंदाश्रूंचा पूर वाहूं लागतो. त्याच्या मुखांतून "वाहवा, अहाहा, श्रीगुरुदेव दत्त" वगैरे आनंदोद्गार बाहेर पडूं लागतात. शरीर रोमांचित होतें. या अवस्थेमध्यें कित्येकांना रेत-स्खलन झाल्याचाहि अनुभव येतो तर कित्येकांना अनावर अशी लघुशंका होते. कधीं कधीं असा अनुभव येतो कीं प्रचंड शक्ति आपल्या शरीरामध्यें प्रवेश करते आणि ताक घुसळण्याच्या रवीप्रमाणें साधकाच्या शरीराची घुसळण करूं लागते. त्या शक्तीचा आवेग येवढा प्रचंड असतो कीं त्या क्षणीं साधकाचें शरीर अक्षरशः पिळून निघतें. अनावर अशा त्या शक्तीचा आवेग आवरण्यासाठीं साधक हातपाय झाडूं लागतो, हातांच्या मुठी आवळतो. दात करकरा चावतो. हातांनीं समोरच्या जमिनीवर जोरजोरानें ताडण करूं लागतो. भूमीवर जोरजोरानें डोकें आपटून घेतो आणि स्वतःच्याच शरीराला बडवायला लागतो. ज्यावेळी साधकाच्या शरीरामध्यें ही शक्ती आविर्भूत झालेली असते यावेळी साधकाला आपण शरीरामध्ये महावीर हनुमान, रुद्र, चंडिका आदि देवतांचा संचार झाल्या सारखा वाटतो आणि साधकाच्या आचारां-बरोबर त्याच्या मनांतील विचार सुद्धां तद्नुरूप होऊं लागतात. या सर्व व्यवहारामध्यें भाग घेऊनहि साधकाच्या मनाचा—जाणिवेचा—एक कोपरा सदैव जागृत अलिप्त राहून या सर्व प्रकारांकडे साक्षित्वाने पहात असतो ही एक अत्यंत आश्चर्याची गोष्ट आहे.

प. पू. गुरुदेवांकडून शक्तिपात दीक्षा घेतल्यावर अनेक साधकांच्या विचारांमध्ये आणि आचारांमध्यें सुद्धां अकस्मात कल्पनातीत बदल होतो. ज्याच्य

मनामध्यें यापूर्वीं कधीं वाईट विचार येवून बेचैनी आल्याचा अनुभव नसतो अशा साधकाच्या मनामध्यें दुष्ट विचार थैमान घालतात आणि साधाक घाबरून जातो. पण श्री. गुरुदेवांनींच "आंतरमनातील जन्मजन्मांतरीचे सुप्त विचार कडाडून वर आले आहेत आणि ते कायमचे जाण्यासाठींच आलेले आहेत" असें आश्वासन दिल्यावर त्याचें समाधान होतें. अनेकदां दिव्य विचारांनीं सुद्धां माणसाचें मन व्यापून जातें. अत्यंत कठीण अशा विषयांवर — विशेषतः आध्यात्मिक — कधीं कधीं असे सुंदर सहज सुलभ विचार बाहेर पडूं लागतात कीं साधक चकित होवून स्वतःशींच म्हणतो — "हें पांडित्य मी शिकलों तरी कधीं ?"

कांहीं साधकांच्या शारीरिक क्रिया थोड्या फार शमल्यावर आणि आसनशुद्धि झाल्यावर आपोआपच प्राणायामाला सुरवात होते. दीर्घ श्वास प्रश्वास भस्त्रिका, भ्रामरी, आंतरकुंभक बहिःकुंभक वगैरे विविध प्रकारचे प्राणायाम आपोआपच होऊं लागतात. आपलेच श्वास कोणीतरी जोरानें खेंचून बाहेर काढीत आहे आणि त्यांना विविध प्रकारें राबवीत आहे हें पाहून साधक आश्चर्यानें चकित होतो. जालंदरबंध अथवा मूळबंध होऊन जो कुंभक लागतो तो एवढा दीर्घकाळ टिकणारा असतो कीं साधकाला प्रश्न पडतो आपला रोधलेला हा श्वास आतां सुटणार कधीं ? पण या दीर्घ कुंभकामुळे साधकाला गुदमरल्या सारखे अथवा कोंडल्यासारखें मुळीं सुद्धां वाटत नाहीं. उलट असें वाटते कीं-ही आपली सहज स्थितीच आहे. या वेळीं विविध प्रकारच्या मुद्राहि होतात. डोळ्यांचीं बुब्बुळें फिरून वर चढतात व दोन्ही बुब्बुळें मध्यावर केंद्रित होतात. साधारण अवस्थेमध्ये ही मुद्रा करताना डोळ्यांनां फार त्रास होतो. पण सिद्धयोगामध्यें या स्थितीमध्यें डोळ्यांना बिलकूल त्रास होत नाहीं. षण्मुखी मुद्रा झाल्यावर तर मिटल्या डोळ्यांसमोर दिव्य प्रकाशाचें असें मनोहर दर्शन घडलें कीं तें शब्दांकित करतांच येणें शक्य नाहीं. डोळ्यांच्या पापण्यांवर असलेल्या बोटांचा दाब आपोआप कमी अधिक होतो आणि त्यानुसार आंतरदृष्टीला दिसणाऱ्या प्रकाशकिमयेमध्यें फेरफार होत रहातात, त्यानंतर अगदीं अनपेक्षित पणें मुखावाटें प्रणवजप सुरू होतो. शब्दाचा जन्म प्रणवाचेमध्यें होतो याची प्रचीति या वेळीं येते. मुखावाटे बाहेर पडणाऱ्या ॐ काराची सुरवात बेंबीच्या आसपास कोठें तरी होत आहे असें भासतें.

( अपूर्ण )...

# श्रीनामदेवांचीं पंजाबांतील स्मृतिमंदिरें

## लेखांक दुसरा

लेखकः– **गणेश विष्णु कविटकर** एम्. ए.

**श्री. कविटकर यांच्या या लेखमालेंतील पहिला लेख गेल्या मे महिन्याच्या अंकात प्रसिद्ध झालेला आहे. संत नामदेवानीं पंजाबांत जाऊन त्या भागांत कांहीं काळ राहून जें प्रभावी कार्य केलें व जें आजतागायत टिकून राहिलें आहे त्याची कल्पना या लेखांवरून वाचकांस सहज येणार आहे.** — संपादक.

ऑल इंडिया श्रीनामदेव सभा, बसी पठाना, या संस्थेच्या विद्यमाने इ.



स. १९५० मध्यें संत नामदेवांच्या स्मरणार्थ हें मंदिर उभारले गेले. उत्तर रेल्वेच्या दिल्ली-नानगल मार्गावर दिल्लीपासून २२५ मैलावर वसलेल्या बसी पठाना गांवात स्टेशनापासून पश्चिमेकडे दोन फर्लांगावर एका निसर्गरम्य तलावाजवळ हे मंदिर उभे आहे. स्टेशनातून बाहेर पडतांच या ऐतिहासिक परिसरांतील हे मंदिर दिसू लागते. पूर्वी बस पठाना हे खेडे पूर्व पंजाब राज्य संघांतील (Eastern Punjab States Union) पेप्सू विभागांत पतियाळा संस्थानात होते. सध्या ते पूर्व पंजाबात आहे.

हे नामदेव मंदिर आकारानें शिखांच्या गुरुद्वारासारखे दिसते. मंदिराच्या आवारांत गाभारा, गाभाऱ्याभोंवती चार बाजूला प्रत्येकी पाच कमानी असलेला चौकोनी सभामंडप व मंडपाच्या सभोवार फुलझाडांचा बगीचा अशी या

मंदिराची रचना आहे. सडकेला लागून असलेल्या मुख्य द्वारांतून मंदिरात प्रवेश करावा लागतो. मंदिराच्या आवारात आंतल्या भागात यात्रेकरूंना राहाण्यासाठी मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला खोल्या व त्यातच उजवीकडे लंगर म्हणजे भोजनगृह आहे. शिवाय एक विहीरही आहे. तिचे पाणी काढण्यासाठी पंपाची सोय आहे.

प्रवेश—द्वारातून सभामंडपाकडे संगमरवरी फरशीवरून जावे लागते. त्या फरशीवर मंदिरास देणग्या देणाऱ्या दात्यांची नांवे हिंदी भाषेत लिहिली आहेत.

## राधाकृष्णाच्या संगमरवरी मूर्ति

मंदिराचा गाभारा व त्या भोवतालचा कमानीयुक्त सभा—मंडप असे दोन भाग आहेत. गाभारा व सभामंडप मंदिराच्या मोकळ्या आवारापेक्षा तीन फूट उंच आहे. गाभाऱ्यास दोन दरवाजे आहेत. एक तलावाच्या बाजूने आणि दुसरा प्रवेशद्वारासमोर. गाभाऱ्याचे क्षेत्रफळ १५० चौरस फूट व भिंती १५ फूट उंचीच्या आहेत. गाभाऱ्यावरील भिंतीला आधार देण्यासाठी या भिंतीचा वरचा भाग गोलाकार बनविला आहे. या घुमटावर सोनेरी कळस आहे. गाभाऱ्याच्या मध्यभागी भिंतीला लागून राधाकृष्णाच्या संगमरवरी मूर्ती आहेत. पंजाबांत अशी एक समजूत प्रचलित आहे की, संत नामदेवांना भगवंतानी बहात्तर वेळा दर्शन दिले आणि एवढा अधिकार किंवा पदवी दुसऱ्या कोणत्याहि भक्तास किंवा संतास प्राप्त झाली नव्हती. या गोष्टीचें स्मरण म्हणून या मंदिरांत नामदेवांचे प्रिय दैवत भगवान् श्रीविठ्ठलाची अर्थात् श्रीकृष्णचंद्राच्या मूर्तीचीही स्थापना करण्यात आली आहे. मूर्तींच्या मागे संत नामदेवांचे पंजाबात रूढ झालेले एक प्रतिमा-चित्र आहे. या चित्रांत नामदेवांच्या चेहऱ्याचा पुढील भाग दिसत असून त्यांत डोक्यावर लांब केस, मिशा व दाढी आणि सबंध मुखचर्या वृद्धावस्थेतील आहे. प्रस्तुत चित्र घोमान येथे पितळी पत्र्यावर कोरलेल्या चित्राची प्रतिकृती असावी. मंदिराच्या समोर बागेच्या आवारांत एक उंच स्तंभ असून त्यावर यात्रेच्या वेळीं धर्मध्वज लावण्यांत येतो. येथून समोरच असलेल्या तलावाचे रमणीय दर्शन घडते.

हे मंदिर पंजाबांत प्रचलित असलेल्या अनेक मंदिरांच्या संमिश्र घाटणीने उभारण्यांत आलें आहे. उत्तर भारतातील ही वास्तु म्हणजे टांक क्षत्रिय, रोहिला

क्षत्रिय इत्यादि जमातींतील नामदेव भक्तांचे घोमानच्या खालोखाल दुसरे श्रद्धास्थान आहे. मंदिराची व्यवस्था ऑल इंडिया श्रीनामदेव सभेकडे आहे. मंदिराचा दररोजचा धूपदीपादि खर्च भागविण्याकरिता मंदिरसभेकडून नामदेव यादगारी सुरक्षा निधी (Namdeo Memorial Reserve Fund) उभारण्यात आला आहे.

### मंदिरास काकासाहेब गाडगिळांची भेट

दिनांक २१ जानेवारी १९६१ रोजी या मंदिरास त्यावेळचे राज्यपाल श्री. काकासाहेब ऊर्फ नरहरी विष्णु गाडगीळ यांनी भेट दिली होती. मंदिरालगत मोठ्या रस्त्याला लागून असलेली सडक त्यांच्याच प्रयत्नाने तयार झाली. म्हणून या सडकेचे 'न. वि. गाडगीळ पथ' असे नामकरण करण्याचा गांवकऱ्यांचा मानस आहे. बसी म्युनिसिपल कमिटीने मंदिरास समांतर असलेल्या सडकेवर विद्युत् दीपयोजना केली असून सडक व पाणी वाहून नेणारी नाली पक्की करण्यात आली आहे.…

मंदिरात दरवर्षी नामदेव जन्मतिथिसमारोह व इतर महोत्सव मोठ्या प्रमाणांत साजरे केले जातात. माघ महिन्यांत वसंत पंचमीस येथे मोठी यात्रा (मेळा) भरते. हा मेळा चार दिवस असतो. या वेळीं मंदिराचा परिसर भाविक यात्रिकांनी फुलून जातो. पंजाबांतील नामदेव भक्तांचे लोंढे या श्रद्धास्थानाकडे वळतात. मंदिरात पूजाअर्चा, भजन, कीर्तन, प्रवचनादि कार्यक्रम होत असतात. येथे संत नामदेवांची पुढील नवी हिंदी आरती म्हणतातः—

## आरती

बोल जै जै नाम देवा ।

जै जै नाम देवा<br>
ईशवर भक्त शिरोमनी मन मोहन देवा ॥ जय....<br>
पंढरपुर नगरी में जनम दियो माता ।<br>
करातक शुकल इकादशी जगमें विख्याता ॥ जय....<br>
तन मन्दिर में मन ने जब आसन लाया ।<br>
ठाकुर दूध पिलाया हरी दर्शन पाया ॥ जय....<br>
जंगल खेलत खेलत शेर चलत आया ।

दौडे बालक सब तुम, पकड गले लाया ॥ जय....
पारस ब्राह्मण का तुम कूप फैंक दीना ।
सच्चा पारस दे इस जीवन सफल कीना ॥ जय....
एक समय जब घर को अग्नि भसम कीयो ।
बाढी वेग मगायो मंडप छाए ॥ जय....
एक अभिमानी धन का तुला दान कीना ।
सम कागज मेंग सोना मान तोड दीना ॥ जय....
प्रान अन्त गऊ कारण तन का कष्ट लिया ।
प्रभु शक्तिबल से तुम जीवन दान दिया ॥ जय....
पखंडन खंडन को तुम तीर्थाटन कियो ।
सत उपदेश से लाखों पापी तार दियो ॥ जय....
शरणागत की अब तुम आकर सार लियो ।
डोलती नय्या को तुम जलदी पार कियो ॥ जय....

येथील ऑल इंडिया श्रीनामदेव सभेने एक ठराव करून "श्रीनामदेव स्नातक कन्या महाविद्यालय" नामदेव मंदिराच्या जागेत सुरू करण्याचा निर्णय घेतला असून त्या बाबत येथील नागरिकांची खटपट चालू आहे.

## नामदेवांच्या स्मरणार्थ गुरुद्वार

गुरुदासपूर जिल्ह्यांतील मरड या गावी नामदेव गेले होते. रामगृह सरदारजींनी या मरड गावी नामदेवांच्या स्मरणार्थ एक गुरुद्वार उभारले आहे. तेथे प्रत्येक महिन्यात अमावास्येला मोठा मेळावा भरत असतो.

घोमान जवळच भट्टीवाल या गावी नामदेवांनी काही काल वस्ती केली होती. या भट्टीवाल गावातील लोकांनी पाण्याकरिता नामदेवांची प्रार्थना केली व त्यांनी सांगितलेल्या जागी तळाव व विहीर खणली. खणल्या ठिकाणी पाणी उफाळू लागले. त्या तलावास नामदेवांच्या स्मरणार्थ 'नामियाना' असे नाव देण्यात आले. या गावीही एक गुरुद्वार नामदेवांचे स्मृतिचिन्ह म्हणून उभारण्यात आले आहे. या भट्टिवाल गावी जल्लो व लद्धा हे विशेष ख्यातनाम असे दोन गृहस्थ नामदेवांचे शिष्य झाले.

त्यापैकी भाई जाल्लो उर्फ जाल्हण हा धारिवाल खेड्यातील सुतार होता. पहिल्या तीर्थयात्रेत तो नामदेवांच्या बरोबर आला होता, असे पुढील अभंग

चरणावरून म्हणता येते – “ निवृत्ति, ज्ञानेश्वर, जनमित्र सोपान। सावता जाल्हण घेऊनि सरिसे ॥ ” तो मूळचा या भट्टिवाल गावचा. पुढे तो पंढरपूर वारी करू लागला. भट्टिवाल येथे त्याचेही स्मारक आहे.

नामदेवांचा दुसरा शिष्य लद्धा हा घोमान जवळच्या सखोवाल या खेड्यातील खत्री. तो या गावात व्यवसाय करून नामदेवांच्या शिकवणीचा प्रचार करी. नामदेवांच्या स्मरणार्थ उभारलेले मंदिर या सखोवाल खेड्यात आजहि आहे.

भाई रद्धा अमृतसर जिल्ह्यातील पट्टिगावचा खत्री. हाही नामदेवांचा विख्यात व करारी शिष्यांपैकी एक होता. नामदेवांच्या स्मरणार्थ अमृतसर येथे एक स्मृति-मंदिर आहे.

## हिंदुमुस्लीम भागांत नामदेवांचें कार्य

नामदेवांनीं हिंदु-मुस्लीम अशा उभय समाजांची वस्ती होती त्या भागात घोमान येथे कायम राहून पदयात्रा केल्या. ही प्राचीन गावे नामदेवांच्या नवविचारास जणू काय आव्हान देत होती.

दुनियापूर व पक्काव रोड ( जि. मुलतान ) मुलतान, लाहोर, लायलपूर, जालंदर, लुधियाना, अंबाला, रोहोतक, भिवानी, हिसार या सर्व गावी नामदेवांची लहान मोठी मंदिरे आजहि आहेत.

हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्यांतील उन्ना तहशीलात उत्तर रेल्वेच्या नानगल स्टेशनजवळ तीन मैलाच्या अंतरावर मंजारा व सुनवली या तीन हजार वस्तीच्या दोन गावांच्या मध्यभागी नामदेवांचे एक स्मृतिमंदिर आहे. या मंदिरात अडीच फूट उंचीची ध्यानस्थ बसलेली नामदेवांची संगमरवरी मूर्ती आहे. वसंतपंचमीला येथे मोठी यात्रा भरते. ही गावे पूर्वी पंजाबात होती.

पंजाबातील गुरुदासपूर जिल्ह्यातील घोमान येथे राहून वरील अनेक ठिकाणी नामदेवांनी पदयात्रा केल्या. या गुरुदासपूर जिल्ह्यात नामदेव संप्रदायाचे अनेक अनुयायी आजही आहेत.

# साक्षात्कार

## ( प्रकरण पांचवे )

लेखकः— कै. के. के. प्रधान

पत्रें वाचून मी तीं परत पाकिटात ठेवून दिली व तें पाकीट तेथेच टेबलावर ठेवून पद्मनाभच्या वडिलांना मी लिहिलेले पत्र टाकण्याकरितां पोस्ट ऑफिसकडे रवाना झालो.

घरी आल्यावर एकदा पद्मनाभच्या दोन्ही भाषणांचा गोषवारा स्वतःशीच वाचून आता पद्मनाभची विचारसरणी गृहस्थाश्रम पत्करण्यास हळू हळू तयार होत आहे असे मी माझे समाधान केले.

येत्या शनिवार-रविवारी सासुरवाडीस जाऊन माझ्या पत्नीस घेऊन यायचे असे मी ठरविले तरी देखील मध्यंतरी एक आठवडा होता. अजूनही बाळराजांच्या करतां तयार केलेला पाळणा आणि पलंग दुकानातून घरी पोचता झाला नव्हता. त्या दिवशीसुद्धा ऑफिसमध्ये गेल्यावर माझ्या सहकाऱ्याला आठवण द्यायची होती. ऑफिसचे कामही अलिकडे फार वाढले होते. तेव्हा महत्वाची कामे शक्यतोवर पुरी केल्याशिवाय शनिवारी-रविवारीसुद्धा सासुरवाडीस जाणे योग्य होईल का याचा मी विचार करू लागलो. कारण फारच कामे तुंबल्यास शनिवार-रविवारसुद्धा ऑफिसात जाऊन ती संपविण्याचा मी प्रयत्न करीत असे. अशा मनःस्थितीत असल्यामुळे नोकरीचे बंधन मला जाणवले व साहजिकच माझ्या मनात विचार आला. पद्मनाभचे काय ? संन्यासाश्रम आणि गृहस्थाश्रम ही दोन्ही त्याला सारखीच आहेत. गृहस्थाश्रम चालवावयास त्याला माझ्यासारखी नोकरी करण्याची गरज नाही. संन्यासाश्रमात काय फुरसतच फुरसत. काहीही जबाबदारी डोक्यावर नाही.

पद्मनाभच्या सुखी जीवनाचा हेवा करीत माझा नित्याचा क्रम सुरू झाला. आयुष्याच्या रोजच्या चाकोरीत पडल्यामुळे दिवसाचे आठ ते दहा तास सतत

काम करून मी बरीच महत्त्वाची कामे पुरी केली. बरेच दिवस लांबणीवर पडलेली एक दोन किचकट प्रकरणे पण यात हातावेगळी केली. असाच थकून एक दिवस बऱ्याच उशीरा ऑफिसमधून रात्री घरी परतल्यावर माझ्या पत्नीचे मला आलेले पत्र पोस्टमनने खिडकीच्या फटीतून आत टाकलेले मला मिळाले. पत्रात तिने मला येत्या शनिवार-रविवार येऊन तिला व बाल-राजाना मुंबईला घेऊन येण्याविषयी बजावले होते. ती आता तिकडे कंटाळली होती व मला भेटण्याची तिची उत्सुकता फार वाढली होती. तेव्हा आता वेगळे पत्र तिला न लिहिता मी तसाच शनिवारी सासुरवाडीला गेलो तरी चालण्या-सारखे होते. मध्यंतरी आता एकच दिवस राहिला होता. कसेही करून उद्या संध्याकाळपर्यंत पाळणा आणि पलंग घरी आणण्याची व्यवस्था करून परवाच्या दिवशीच सकाळी मी सासुरवाडीला जाण्याचे निश्चित केले व त्या तयारीला लागलो.

माझे श्वशुर आणि सासूबाई एका आठवड्यापूर्वीच गावाहून परत आल्या होत्या. तिकडे कुलदेवतेची खणानारळानी ओटी भरून माझ्या पत्नीच्या आणि बालराजांच्या प्रकृतीस स्वास्थ्य आणि कल्याण याबद्दल प्रार्थना करून बालराजांचा नामकरणविधी समारंभ कधी करायचा या विचारात ते होते. दिवस निश्चित करण्याचे काम माझ्यावर सोपविणे त्याना प्राप्त होते म्हणून ते माझी आतुरतेने वाट पहात होते. मी तिकडे पोहोचल्यावर आम्ही सर्वांनी मिळून त्यासाठी रविवारचा दिवस मुक्रर केला. कारण उशीरात उशीरां म्हणजे सोम-वारच्या सकाळच्या बसने मला माझ्या पत्नीला आणि बालराजांना घेऊन मुंबईला परतणे भाग होते.

माझे श्वशुर या गावी बरीच वर्षे स्थायिक झाल्याकारणाने आजूबाजूच्या कित्येक बिऱ्हाडांची त्यांची अगदी दाट ओळख झाली होती. रविवारच्या समा-रंभात बरीच मंडळी येणार होती. बोलावणी करण्याचे काम मीनाने पत्करले. तिचा उत्साह तर आता अगदी ओसंडून जात होता. रविवारी सकाळपासूनच सर्व घर साफसूफ करून इकडल्या वस्तू तिकडे योग्य तऱ्हेने लावून जय्यत तयारी करावयास आम्ही सर्वच लागलो.

सासुबाई निमंत्रित पाहुण्यांसाठी काय पदार्थ तयार करावयाचे ते ठरवून

त्याच्या तयारीस लागल्या. शेजारपाजारची बायका मंडळी तर दुपारी तीन वाजल्यापासूनच येणार होती. पुरुष मंडळी संध्याकाळी सहा वाजल्यानंतर येणार होती. बाळराजांना पाळण्यात घालण्यासाठी खास आमच्या पत्नीचा जपून ठेवलेला बाळपणीचा पाळणा बाहेर काढण्यात आला. मीनाने त्या पाळण्याला शृंगारण्यासाठी कितीतरी निरनिराळ्या सुंदर फुलांच्या माळा आणल्या होत्या. पाळण्याच्या वरच्या दांडीला टांगण्याकरिता एक सोनेरी वर्खाच्या राघूमैनांचे सूत्रबद्ध पथकच्या पथक आणले होते. पाळण्यावर घालण्याकरिता त्याच मापाची वेलबाहुलीची व किनखापी किनारीची मच्छरदाणी मुद्दाम तयार करविली होती. शिवाय माझ्या पत्नीने आणि मीनाने बालराजांकरिता शिवलेल्या कितीतरी रंगीबेरंगी झबली आणि टोपडी यांचा ढीग बाजूला एका टेबलावर व्यवस्थित लावून ठेवला होता.

नामकरणविधी मोठ्या थाटाने पार पडला. बाळराजांना ओवाळून सुवासिनींनी त्याच्या कपाळावर व गालावर दृष्ट लागू नये म्हणून गोल काजळाची काळी तीट लाविली. आधीच गौर, सशक्त, गुटगुटीत बालराजाला तो फारच खुलून दिसू लागला. सर्व समारंभ संपल्यावर मी बालराजाला उचलून त्याचे प्रेमाने पटापट मुके घेतले, बालराजांचे नांव विवेक ठेवले होते. माझ्या मनात विचार आला स्वामी विवेकानंदांसारखा पराक्रम गाजविण्यासाठी बाळराजे पद्मनामचाच मार्ग तर चोखाळणार नाहीत ना ? माझे मलाच हसू आले व तो विचार दूर सारून दुसऱ्या दिवशी सकाळी पत्नीला व बाळराजांना मुंबईला घेऊन जाण्याच्या उत्सुकतेने त्यांची कपड्यांची पेटी नीट भरून लावण्याच्या तयारीला लागलो.

सासुरवाडीला जाण्यापूर्वीच मी घर कसे स्वच्छ व साफ करून आमच्या शयनगृहात योग्य ठिकाणी पाळण्याची व पलंगाची सोय केली होती. हा सर्व थाटमाट पाहून आमच्या राणीसाहेब खूष होणारच अशी माझी अपेक्षा होती. परंतु शयनगृहात शिरताच हा कोणी पाळणा येथे वेड्यासारखा ठेवला असे म्हणून तो सरकन पलंगाजवळ ओढून त्यांत आमच्या पत्नीने बालराजांची व्यवस्था केली. घरात नवीन दोन सुंदर वस्तू आणल्याबद्दल माझी तारीफ करायची सोडून अशा प्रकारे नाखुषी दर्शविल्यामुळे मी प्रथमतः एकदम निरुत्साही झालो. एकंदरीत बालराजांच्या जन्मापासून आमच्या पत्नीच्या स्वभा-

वात तिला नकळत बदल झाला होता. हे आता माझ्या वारंवार लक्षात येऊ लागले. आनंदी व उत्साही होण्याऐवजी ती जरा तिरसट बनत चालली होती. दिवसभर स्वयंपाक, घरची सर्व व्यवस्था, लहान मुलाचे संगोपन ही त्रिविध जबाबदारी न झेपल्यामुळे हा फरक झाला असावा असे मनाशी समजून मी तिकडे कानाडोळा केला.

दिवस झपाट्याने जात होते. पत्नीच्या स्वभावातील उणीव बालराजाच्या गोड सहवासात भरून काढून मी माझ्या आयुष्याचा मार्ग आक्रमीत होतो. इतक्यात एक दिवस पद्मनाभच्या आईने मला लिहिलेले एक कार्ड मिळाले. त्यावरील मजकूर लिहिण्याची सवय नसल्यामुळे जरा वेडावाकडा, अशुद्ध बालबोध लिपीत होता. पत्रावरून पद्मनाभचे वडील अत्यवस्थ स्थितीत असून मला गावी शक्य तितक्या लवकर बोलाविले होते. हे पत्र सकाळीच आफिसात जाण्यापूर्वी आले म्हणून बरे झाले. जेऊन ताबडतोब ऑफिसात जाऊन रजेची व्यवस्था करून मी परस्पर पद्मनाभच्या गावचा रस्ता धरला. नशीबाने बसही ताबडतोबच होती. पद्मनाभचे घरी जाऊन पोचलो. पद्मनाभ माझ्या आधीच दोन दिवस तेथे आला होता. परंतु त्या आधीच त्याच्या आईने मला कार्ड घातले होते असे कळल्यावरून त्याने मला पत्र लिहिण्याचा विचार सोडून दिला होता. खरे म्हणजे वडिलांच्या अत्यवस्थ प्रकृतीमुळे मला पत्र लिहिण्याच्या मनःस्थितीत तो नव्हता. मी गेलो तेव्हा त्याचा चेहेरा मला बराच गंभीर दिसला. आजूबाजूला सुद्धां एक प्रकारची भीतिप्रद शांतता पसरली होती. कोणी कोणाशी काही न बोलता एखाद्या निर्जीव यंत्रासारखे काम करीत होते, पद्मनाभची आई पद्मनाभच्या वडिलांच्या बिछान्यापाशी बसून राहिली होती. मला पाहताच तुला कार्ड उशीरा मिळाले वाटते एवढे शब्द बोलून पद्मनाभ गप्प राहिला होता. मी तिथेच शेजारी चिंतातुर मुद्रा करून बसलो.

पद्मनाभच्या वडिलांची आता मुळीच आशा उरली नव्हती. तीन-चार दिवसापूर्वी दुपारच्या प्रहरी मागील विहिरीवर ते पाणी आणण्यास गेले असता पाय घसरून पडले होते व तेव्हापासून बेशुद्धावस्थेत होते. तेथील डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे हा अर्धांगवायूचा झटका असून मेंदूतून रक्तस्रावही झाला होता. त्यामुळे ते जगण्याची काही एक आशा नव्हती. तेव्हा त्यांना मुंबईला नेण्यात

तरी काय अर्थ आहे असा डॉक्टरांनीं सल्ला दिल्यामुळे पद्मनाभ हताश वृत्तीने त्यांच्या मृत्यूची वाट पहात तेथेच थांबला होता.

जन्ममृत्यूच्या सीमारेषा पुसून हे दृश्य जगत व अतींद्रिय सृष्टी या दोन्ही प्रदेशांकडे एऱ्हवी हसतमुख बघणारा पद्मनाभ तो हाच की काय असा मला थोडा वेळ संभ्रम झाला. एवढ्या मोठ्या भोवतालच्या विस्तीर्ण इस्टेटीला लाथ मारून संपत्तीचा काही एक लोभ न धरता संसारसुखाकडे इतक्या शौर्याने पाठ फिरविणारा पद्मनाभ वडिलांच्या मृत्यूमुळे आपणावर पडू पहाणाऱ्या संसाराच्या बोजाने इतका का घाबरून जावा हा मला प्रश्नच पडला. अंगावर हसत भगवी वस्त्रे परिधान करणारा पद्मनाभ ती वस्त्रे टाकून संसारी माणसासारखी साधी वस्त्रे परिधान करण्यास इतका का कचरत होता कोण जाणे !

# ही बाबांची कृपादृष्टि

लेखक : श्री. आर्. आर्. आडारकर

मी १९५२–५३ सालापासून गेली १८ वर्षे श्री साईलीला मासिकाचा वर्गणीदार आहें. मला जे कांहीं अनुभव आले ते मी लिहून पाठवीत आहें.

ही १९५३ सालची गोष्ट आहे. मी व माझी पत्नी दादर मार्केट जवळून जात असतां अचानक तिची नजर दुकानांतील एका फोटोकडे गेली व ती म्हणाली, "हेच ते श्रीसाईबाबा कीं ज्यांची आम्ही माहेरी सोलापूरला नेहमीं पूजा करतों." व मी म्हणालों "ठीक आहे; आपण तो फोटो विकत घेऊं या;' व त्याप्रमाणें आज गेलीं १८ वर्षे श्रीबाबांच्या तसबिरीची पूजा आमच्या घरांत मनोभावें होत आहे.

असें करण्याचें त्यावेळी एक कारणही होते. त्याच वर्षी माझी नोकरी गेलेली होती. मी ॲसिस्टंट स्पिनिंग मास्तर म्हणून श्रीकृष्णराज ठाकरसींच्या मिलमध्ये होतो. तसें पाहिले तर माझें त्या ठिकाणी चांगले चाललें होतें. परंतु माझा वरिष्ठ अधिकारी फार अरेरावी, दयामाया नसलेला असा होता. त्यामुळें ती नोकरी सोडावी लागली. श्रीबाबांचा फोटो घरांत आणल्यावर लवकरच मला दुसरी नोकरी मिळाली. असें होतां होतां ५६ साल उजाडलें व मी फार आजारी पडलों. पुष्कळ दिवस हॉस्पिटलमध्यें पडून होतो. माझ्यावर पुष्कळ औषधोपचार चालू होते. पण अंगातला ताप कांहीं केल्या हटत नव्हता. व डॉक्टरनाही त्याचे नवल वाटत होते. मी स्वतः माझी आशा सोडली होती. असे होता होता सतत तीन दिवस मला स्वप्नात श्रीबाबांचे दर्शन होत होतें. तिसऱ्या दिवशी स्वप्नांत माझा स्वतःचा मृत्यू मला दिसला. अगदीं अग्निसंस्कार होईपर्यंत सर्व दृश्य मला दिसत होतें. अकस्मात् असा कांहीं चमत्कार दिसला कीं, श्रीबाबांनी तिथें येऊन माझ्यावर पाणी शिंपडलें व मला उठवून बसविलें. यावेळीं माझ्या नातलगानां मी सांगतोय कीं "पहाता काय ? बाबांना नमस्कार करा!" दुसऱ्या दिवशीं माझा ताप उतरला आणि डॉक्टरनाही त्याचें फार आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, "आतां कांहीं भीती नाही." त्यावेळी माझी बाबांच्या-वरील श्रद्धा अढळ झाली व आज त्यांच्याच आशीर्वादावर सर्वकांही व्यवस्थित चालू आहे.

**दुसरा प्रसंग —**

१९६१ सालीं माझ्या मुलीच्या लग्नाच्यावेळीं घडला, त्यावर्षीं मी कोंकणातील एका गावीं माझ्या मुलीच्या लग्नाला नातेवाईकांसह गेलो होतों. लग्नानंतर दोन दिवसांनीं आम्हांला जवळच्या एका नातेवाईकाकडे जायचें होतें. तें गांव सुमारें ५।६ मैल लांब होतें. प्रवास बैलगाडींतून करावयाचा होता. वाटेत एक नदी ओलांडून पुढें जायचें होतें. नदीच्या पलीकडे दुसरी गाडी आम्हांला नेण्यासाठीं येणार होती. आम्ही नदीकाठीं आलों तेव्हा संध्याकाळ झाली होती. झाडीमुळें अंधार पडूं लागला होता. जवळपास वस्ती नव्हती. आणि आम्हांला नेण्यासाठी येणारी गाडी आली नव्हती. आम्हा सर्वांना फार काळजी वाटूं लागली. अंगावर दागदागिने असलेली ५।६ बायका-मंडळी माझ्याबरोबर

होती. अंधार पडलेला. जवळपास कोणी सामान पलीकडे नेण्यासाठी मिळतो का हें मी पहात होतों. कोणीही मिळेना. यावेळी मनातून सारखा बाबांचा धांवा करीत होतों. अतिशय हताश झालों होतों; कारण नदीकाठीं सबंध रात्र काढावी लागली असती. असाच इकडे तिकडे पहात असतां समोरून बैल-गाडी येतांना दिसली. मी त्याला आम्हा सर्वांना नातेवाईकांकडे पोहोचविण्याबद्दल विनंती केली व "तुला काय लागतील ते पैसे घे" असे सांगितलें. त्यावर त्याचे उत्तर ऐकून आम्ही आश्चर्यचकितच झालों. तो म्हणाला, "ही गाडी तुमच्यासाठींच पाठविलेली आहे. मला उशीर झाला म्हणून आपण रागावूं नये. मी शेतांतून दुपारीं काम करून आलों तो उन्हामुळे मला झोप लागली. पण संध्याकाळच्या सुमारास मला असा भास झाला कीं माझ्या कानांत कोणीतरी सांगत आहे कीं, 'अरे झोपलास काय ? गाडी घेऊन जा, नदीकाठीं मंडळी तुझी वाट बघत आहेत. मी झोपेतून जागा झालों तों मालक मला म्हणाले 'अरे तू अजून इथें कसा ? तुला सकाळींच सांगितले होतें ना कीं गाडी घेऊन जा म्हणून ?

माझी श्रद्धा अधिकच अढळ होत गेली. याला आपण श्रीबाबांचा चम-त्कारच म्हणावयास पाहिजे. माझी बाबांच्यावर नितांत भक्ति आहे. श्रद्धा आहे. मी असेंच म्हणेन कीं वेळोवेळी माझी सर्व चांगली कामें श्रीबाबांवरील श्रद्धे-मुळेंच पार पडत आलीं आहेत.

# मुंडकोपनिषद् आणि विज्ञान

## लेखांक पहिला

—लेखक शाहीर **पां. द. खाडिलकर**
एम्. ए. बी. टी.

आर्यधर्माच्या अति प्राचीन धर्मग्रंथांत उपनिषदांचे अनन्यसाधारण असे महत्वाचे स्थान आहे. ऋग्वेदांत निसर्गदेवतेची स्तवनें आहेत. निसर्गांतील ज्या इंद्रादि देवता, त्यांना प्रसन्न करून घेणें ह्याचसाठी ती स्तवनें प्राचीन ऋषींना स्फुरली आहेत. पण त्यानंतरच्या काळांत मानव जास्त जास्त विचारवंत झाला आणि त्याला निसर्गाचे कोडे उलगडण्याचे जणू काय वेडच लागले. सृष्टिकर्ता कोण, सृष्टि आणि सृष्टिकर्ता ह्यांचा अन्योन्य संबंध काय, शरीर ही काय वस्तु आहे, ती कशी बनते, त्याचा मालक कोणी आहे कीं नाही, तो असल्यास त्याचा आणि शरीराचा संबंध किती प्रमाणांत असतो आणि तो किती काळ टिकतो, आत्मा आणि जगदात्मा यांचा अन्योन्य संबंध काय आहे, जन्ममृत्यु हे काय गौडबंगाल आहे इत्यादि बुद्धिगम्य विषयावर प्राचीन ऋषिवर्य विचार करू लागले. हे प्रश्नच मुळी इतके गहन आहेत कीं त्यांच्याविषयीं निश्चित माहिती सिद्धान्तरूपानें सांगणें हे अवघड काम करण्याठी ऋषींना दृष्टि अंतर्मुख करावी लागली. जगातून दूर एकांतस्थळीं जाऊन विचारमंथन करावे लागले आणि त्यासाठी मन एकाग्र करून खूप विचार करावा लागला. एकांती विचार करीत असतांच त्यांना त्या कूटप्रश्नाची उत्तरे मिळू लागली आणि तीं एकत्रित केलेली उत्तरें म्हणजे **अध्यात्मतत्त्वज्ञान** होय. हें अध्यात्म समजून घेण्यासाठी ठिकठिकाणचे शिष्य अत्यंत जिज्ञासेने अरण्यांत वसत असलेल्या ऋषींच्याकडे जाऊ लागले आणि जिज्ञासा तृप्त करून आपल्या जीवनाला श्रेष्ठ दर्जाचे वर्णन देऊ लागले.

उपनिषद् म्हणजे गुरूजवळ जाऊन बसणें आणि अध्यात्मज्ञान मिळविणें. मुमुक्षुजनानी गुरूची सेवा करावी आणि ऋषीनी त्याना ज्ञानसंपन्न करावें अशी प्राचीनकाळी ज्ञानदानाची पद्धति होती. सर्व उपनिषदे म्हणजे गुरु-शिष्यांच्या संवादानीच संपन्न केली गेली आहेत. प्रमुख उपनिषदे १२ आहेत. त्यांपैकी **मुंडकोपनिषद** हे फार मोलाचे आहे. मुंडकोपनिषदाची तीन मुंडकें आहेत. मुंडक म्हणजे भाग. प्रत्येक मुंडकाचे दोन दोन पोटविभाग आहेत. म्हणजे मुंडकोपनिषदाची तीन मुंडकें असून एकूण सहा विभाग आहेत. पहिल्या मुंडकांत गुरुपरंपरा व परा आणि अपरा विद्या यांचे वर्णन आलेले आहे. त्यानंतर यज्ञयागादि कामे आणि त्याचे गुण दोष यांचें वर्णन आहे. दुसऱ्या मुंड-कांत सृष्टीची उभारणी व संहारणी आणि क्षेत्रज्ञ विचार आला आहे. तिसऱ्या मुंडकांत जीवशिव यांचें ऐक्य आणि ब्रह्मज्ञान व मोक्ष हे विचार मांडलेले आहेत.

सर्वच दृष्टीनें हे उपनिषद् महत्वाचें असल्यामुळे प्रत्येक खंडाचें व्यवस्थित विवरण करणें आवश्यक आहे.

ब्रह्मज्ञान आणि तद्द्वारा मोक्ष हाच या उपनिषदाचा प्रमुख विषय अस-ल्यामुळें ते ब्रह्मज्ञान कसे प्राप्त होईल, याची माहिती आधीं दिली आहे.

गुरुमुखांतून ही विद्या मिळू शकते आणि शिष्याची योग्यता प्रबळ असेल तरच ती त्याला मिळू शकते.

उपनिषदाला प्रारंभ करण्याच्या आधींच मंगल स्तवन करण्यांत आले आहे ते स्तवन असें :—

**ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।**
**स्थिरैरंगैस्तुष्टुवाँसस्तनूभिः। व्यशेम देवहितं यदायुः।**

**याचा अनुवाद** असा करता येईल—

देवानो, आम्ही कानांनी चांगलें तेंच ऐकावे; यज्ञ करणाऱ्यांच्या रक्षक देवानो, डोळ्यांनी चांगले तेंच पाहावें. आणि सुदृढ अशा शरीराने इंद्रियांच्या साहाय्याने तुमचेच स्तवन आम्ही करीत राहावे आणि तुमची सेवा करण्यातच आमचे जीवन समाप्त व्हावे.

वाचकहो, किती उदात्त भावना आहे ही !

ब्रह्मविद्या प्राप्त करून घेण्यासाठी गुरूचीच कृपा पाहिजे. हें सांगण्यासाठीं सुरवातीलाच गुरुपरंपरा सांगितली आहे. ब्रह्मविद्या प्रथम ब्रह्म्यानें अथर्वाला सांगितली, अथर्वाने अंगिराला, अंगिराने सत्यवह भारद्वाजाला आणि त्यानें ती अंगिरसाला सांगितली.

अशा श्रेष्ठ परंपरेनें ज्याला ब्रह्मविद्या प्राप्त झाली होती अशा त्या अंगिरसाकडे शौनक नावाचा एक जिज्ञासू ब्रह्मविद्या शिकण्यासाठी गेला. हा शौनक महाशाल म्हणजे मोठा सुखवस्तु गृहस्थ होता. पण ऐहिक सुखांत गुरफटून न जाता तो जगताचे गूढ समजाऊन घेण्यासाठी अंगिरसाकडे गेला आणि गुरूना अत्यंत नम्रभावानें वंदन करून मोठ्या मर्यादेने म्हणाला "मुनिवर्य ! संसारसुखापासून अंतिम मनःशांतता मला मिळत नाही तर मनःशांति ज्या योगाने होईल असें काही शिकण्यासाठी मी आपणाकडे आलो आहे. मुनिवर्य, एक प्रश्न मला उमगत नाही तो प्रश्न असा— "भगवन्, कोणत्या वस्तूचे ज्ञान झाल्यावर ह्या सर्व विश्वाचे ज्ञान होईल तें मला सांगावे."

कोणतीही विद्या देण्यापूर्वी शिष्य कसा आहे, त्याची लायकी आहे कीं नाहीं, ब्रह्मविद्या प्राप्त करून घेण्यासाठीं जरूर त्या गोष्टी त्याच्याजवळ आहेत कीं नाहीं, हें प्रथम पाहणें आवश्यक असते. मोतींपणा प्राप्त करून घेण्यासाठीं योग्य काळी योग्यवेळीं व योग्य स्थळींच मेघजलबिंदु पडला तरच तो बिंदु मोतीं होतो.

शिष्याच्या ठिकाणीं कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते ? ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्यानाच शास्त्रांत **साधनचतुष्टय** असें म्हटले आहे. साधन चतुष्टय म्हणजे चार साधनें. ती कोणती ?

आचार्यांनीं खालीलप्रमाणें तीं सांगितलीं आहेत.

**श्लोक—**

**आद्यं नित्यानित्यवस्तुविवेकः साधनं मतम् ।**
**इहामुत्रार्थफलभोगविरागो द्वितीयकम् ॥**
**शमादिषट्कसंपत्तिस्तृतीयं साधनं मतम् ।**
**तुरीयं तु मुमुक्षुत्वं साधनं शास्त्रसंमतम् ॥**

(सर्ववेदान्तसारसंग्रहांतून)

अनुवाद असा करतां येईल कीं (१) नित्यानित्यवस्तुविवेक (२) अर्थ-फलभोगविराग (३) शमादिषट्कसंपत्ति आणि (४) मुमुक्षुत्व. नित्य व अनित्य वस्तु समजून घेण्याची पात्रता, फलभोगेच्छा न धरणें, शमदम वगैरे सहा गुण अंगीं बाणणे आणि मुक्त होण्याची प्रबळ इच्छा !

ह्या चार गोष्टी ज्याच्याजवळ स्थिरत्वानें राहात आहेत तोच शिष्य ब्रह्मविद्या प्राप्त करून घेण्यास अधिकारी झाला म्हणजे योग्य झाला असा अर्थ.

शिष्य जर नास्तिक असेल, त्याच्या ठिकाणीं जर आंतरिक तळमळ नसेल तर ती विद्या त्याला मिळणार नाहीं.

समर्थांनीं हेंच वर्णन केलें आहे. शिष्यलक्षणें त्यानीं सांगितलीं आहेत तीं अशी—

**ओव्या**

जो संतासी शरण गेला । संतजनीं आश्वासिला ।
मग तो साधक बोलिला । ग्रंथांतरी ॥
नानासंदेह निवृत्ति । व्हावया धरी सत्संगती ।
आत्मशास्त्र गुरु प्रचीती । ऐक्यतेसी आणी ॥
कामापासून सुटला । क्रोधापासूनि पळाला ।
मदमत्सर सांडिला । एकीकडे ॥
मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्‌गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।
अनन्यभावे शरण । त्या नाव सच्छिष्य ॥

वरील सर्व गोष्टी शौनकाजवळ होत्या. तो पूर्णपणें **साधक** बनला होता. या विषयीची **अभंग रचना**:—

मुमुक्षु शौनक अंगिरसा बोले । अंतर्मुख झाले चित्त त्याचें ॥ १ ॥
आपुल्या चरणी शौनक हा आला । तत्व जाणण्याला गुरुराया ॥ २ ॥
तळमळ चित्ता लागली ही फार । करा उपकार गुरुराया ॥ ३ ॥
काय जाणल्यानें मन स्थिरावेल । कोडें उकलेल ब्रह्मांडाचें ॥ ४ ॥

(स्वकृत)

ही ब्रह्मविद्या सद्गुरूस शरण गेल्यावरच प्राप्त होऊ शकेल.

अंगिरसानी शौनकाला विषय सांगण्यास सुरुवात केली. शौनका, महत्त्वाच्या अशा दोन विद्या आहेत असे ब्रह्मविद् सांगतात. एक परा विद्या आणि दुसरी अपरा विद्या. अपरा विद्येत कोणकोणते विषय अंतर्भूत होतात ? सर्व प्रकारच्या ऐहिक विद्या म्हणजेच अपरा विद्या. चार वेद व सहा शास्त्रे प्राचीनकाळी ह्या दहा विद्या म्हणजेच अपरा विद्या समजल्या जात असत आणि आज या विज्ञानयुगातसुद्धा तें खरें आहे. ह्या दहा विद्यांत ज्योतिष हें एक शास्त्र आहे. ज्योतिष शास्त्र म्हणजे खगोलशास्त्र. आकाशातील दिसणारे व न दिसणारे असंख्य तेजोगोल, ग्रह वगैरे सर्वांचे ज्ञान ब्रह्मविद्याभ्यासापूर्वी झाले पाहिजे.

खगोलविद्येचा म्हणजेच विज्ञानाचा चालू युगांत अत्यंत वेगानें अभ्यास चालला आहे आणि नेत्रदीपक प्रगतीही झाली आहे. तेजोगोलांचे परस्पर आकर्षण, त्यांचे किरण, त्यांच्यामधील अंतर, त्यांच्या कक्षा, दोन ग्रहांच्या मधील अवकाश, त्यांचा अभ्यास इत्यादि विषयांत आज अपूर्व प्रगति झालेली दिसत आहे. मानवाची झेप चंद्रापर्यन्त जाऊन पोहोचली आहे. ब्रह्मांडाचे कोडे हळू हळू मानव उलगडूं लागला आहे. थोड्या भविष्यकाळांतच सर्व ग्रहांचे यथार्थ ज्ञान मानवास होईल असा रंग दिसत आहे, पण हें सर्व अपरा-विद्येतच येते. अपराविद्यांचा अभ्यास जेथें संपतो तेथेंच परा विद्या सुरू होते. विज्ञानाचा पूर्ण विकास होऊन तें जेथें संपते तेथेंच ब्रह्मविद्येची सुरुवात होते.

आज माणूस ज्ञेयापासून अज्ञेयाकडे जात आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं प्राचीन ऋषींनीं अज्ञेय वस्तु आधींच सांगून टाकली आणि त्या अज्ञेयापासून सर्व ज्ञेय सृष्टि विस्तारली असें सांगितलें.

परा विद्या तीच कीं ज्या विद्येमुळे अक्षराचे म्हणजे परब्रह्माचें संपूर्ण ज्ञान होते.

'अथ परा यया तदक्षरमधिगम्यते'

(मंत्र ६, प्रथम मुंडक)

अक्षराचें वर्णन थोडक्यांत सारांश रूपानें प्रथम मुंडकाच्या प्रथम खंडांतील सहाव्या मंत्रांत केलें आहे. तें अक्षरतत्त्व कसें आहे ? तें दिसत नाही, ग्रहण करता येत नाही त्याला गोत्र नाहीं, वर्ण नाहीं, चक्षुरादि इंद्रियद्वारा तें आकलित होत नाही. तें नित्य सर्वत्र भरलेलें अत्यंत सूक्ष्म आहे आणि तें सर्व जगताचे आरंभस्थान आहे. अशा त्या आद्य अक्षरतत्त्वापासून सर्व ब्रह्मांड निर्माण झालें.

असें वर्णन प्रथम मुंडकांतील प्रथम खंडांत आलें आहे. अर्थात यावरून असे स्पष्ट दिसत आहे की अखिल ब्रह्माचे मूळतत्त्व एकच आहे. आणि त्यालाच परब्रह्म असे म्हणतात. त्या पासूनच सर्व जगद्विस्तार झाला. याचें यथार्थ वर्णन करणारा एक अभंग तुकोबारायांचा देऊन हा पहिला लेख येथेच संपवितों.

### अभंग

पय दधि घृत आणि नवनीत । तैसे दृश्यजात एकपणे ॥ १ ॥
कनकाचे पाहीं अलंकार केले । कनकत्व आले एकपणे ॥ २ ॥
मृत्तिकेचे घट झाले नानापरी । मृत्तिका अवधारी एकपणे ॥ ३ ॥
तुका म्हणे एक एकते अनेक । अनेकत्वीं एक एकपणा ॥ ४ ॥

# गीतेचें सारभूत मार्गदर्शन

(लेखांक पहिला).

लेखक—डॉ. रा. य. परांजपे

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ गी. अ. १८/५३**

गीतेंतील अठराव्या अध्यायांतील या महत्त्वाच्या श्लोकाचा आपण विचार करणार आहोंत. गीतेंतील हाच श्लोक महत्त्वाचा कशावरून असें कोणी म्हणेल तर त्याला भगवंतांनींच उत्तर देऊन ठेवलें आहे. परमार्थ म्हणून मनुष्यानें काय करावे या विषयीं गीतेमध्यें यापूर्वीं अनेकप्रकारें मार्गदर्शन केलेलें आहे. अधिकारभेदानें विशिष्ट व्यक्तींना त्याचा उपयोग निश्चित आहे. परंतु अधिकारभेद न ठेवतां सर्वांनाच सर्वोत्तम असें कांहींतरी भगवंतांना सांगावयाचें होतें. जें पूर्वी देखील सांगून झालेलें होतें तेंच पुनरपि हृदयांतील गुह्य म्हणून पुन्हा एकवार त्यावरच विशेष जोर देऊन सांगावें असें भगवंतांनीं ठरविलें आणि गीता सांगतां सांगतां तें वरील श्लोकांत मोठ्या गौरवानें सांगण्यास सुरवात केली आणि या व पुढील श्लोकांत तें सांगून टाकलें.

या दोन श्लोकांचें महत्त्व ज्ञानोबांनीं एकाच ओवींत आणलें आहे —

**—म्हणौनि आघवींचि गूढें । जें पाऊनि अति उघडें ।**
**तें गौप्य माझें चोखडें । बाक्य आइक ॥ १३५२/१८**

पुढील श्लोकांत भगवंतांनी जें गौप्य आणि चोखडें वाक्य सांगितलें आहे तें अद्यापपर्यंत सांगितलेंच नव्हतें काय ? नव्हे ! जें पूर्वीं सांगून झालेलें आहे परंतु मध्यंतरी अनेक गोष्टी सांगून झाल्यामुळें या महत्त्वाच्या मुद्याकडे अर्जुनाचें दुर्लक्ष होईल म्हणून अत्यंत महत्त्वाच्या या गोष्टीकडे अर्जुनाचें लक्ष

पुन्हा वेधून घेण्यासाठीं तेंच तत्वज्ञान पुन्हा येथें सांगत आहेत. आणि आवडीची गोष्ट पुनः पुनः प्रेमिकाजवळ सांगतांना अवीट गोडीचाच लाभ होतो. म्हणून भगवान श्रीकृष्णांनीं या श्लोकाच्या पूर्वीं याची प्रस्तावना केली आहे ती पहाणें आवश्यक आहे. श्लोक असा आहे—

**सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः।**
**इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्॥** १८/६४

अर्थ— सर्व गुह्यांहून अत्यंत गुह्य, अत्यंत रहस्य असें हें माझें उत्कृष्ट वाक्य तूं पुन्हा ऐक. पूर्वीं वारंवार जरी सांगितले आहे तरी पुन्हा सांगतों. तूं मला अत्यंत प्रिय आहेस. म्हणून मी पुनः पुनः सांगतों.

भगवंताचे भक्ताविषयींचें प्रेम किती अमर्याद असतें याचें दर्शन ज्ञानोबांच्या वाणीनें प्रकट घडविलें आहे.

**तैसें पार्था तुझेनि मिषें। मी बोलें आपणयाचि उद्देशें।**
**माझ्या तुझ्या ठाईं असे। मी तूंपण गा॥** १८/१३४८

अर्जुनाबरोबरच्या या संवादांत द्वैतभावच नाही ! हा अद्वैत संवाद आहे. 'संवादीं द्वैत गिळणें' असें आहे. येथें भगवंताची अंतरंग अवस्था काय आहे ? भगवान म्हणतात :-अर्जुना! मी तुला फक्त निमित्त करून बोलत आहें. वस्तुतः मी माझ्याशीं व माझ्यासाठींच बोलत आहें. तुझें हित तेंच माझें हित! तुझ्यांत व माझ्यांत फरक नाही. तुझ्या माझ्यांतील जो प्रेमसंबंध आहे त्यामुळे तुझ्याशीं बोलतांना मी माझ्याशींच बोलत आहें असें मला वाटतें!

**'म्हणोनि जिव्हारीचे गुज। सांगतसे जीवासी तुज।**
**हें अनन्यगतीचें मज। आधी व्यसन॥** १८/१३४९

याच आत्यंतिक प्रेमभावनेमुळें माझ्या अगदी जिव्हारीचें गौप्य तुझ्या जीवाला सांगतों आहे. आणि हें असें अनन्यगतीचें मला मुळीं व्यसनच आहे! त्यामुळें 'माझिये जीवीचें पडो तुझ्या जीवीं' असें वाटतें दुसरे काय!

नवव्या अध्यायांत गुह्यतम ज्ञान सांगतांनासुद्धां भगवंताची हीच स्थिति झाली होती. त्या प्रसंगाचें भावपूर्ण वर्णन ज्ञानेश्वरींत पुढील प्रमाणें आहे. भगवान म्हणतात—

'अगा थानी कीर दूध गोड। परि थानें सीचि नव्हे की गोड।
म्हणोनि सरो कां सेवितयाची चाड। जरी अनन्य मिळे॥ ३८

मातेच्या स्तनांत दूध आहे. तें स्तनांतच ठेवण्यांत का मातेस सुख आहे? नाहीं. परंतु तें कोणाला तरी पाजण्यांत का तिला सौख्य आहे? तें दूध तिला तिच्या लाडक्या लेंकराला पाजण्यांतच तिला संतोष आहे. म्हणजेच अनन्यगति अशी प्रेमाची व्यक्ति .... प्रेमाच्या व्यवहाराला पाहिजे. भगवान अर्जुनाला म्हणतात— 'अर्जुना, तूं असाच माझ्याशीं अनन्यगतिक असल्यामुळे मला माझें गुह्यतम ज्ञान तुला सांगतांना अत्यंत आनंद होत आहे. गुरुशिष्य संबंध हा प्रेमाचा विहार आहे!

"गुरुशिष्य मिसे। हाचि एकू उल्हासे"

गुरुशिष्याला बोध करतात तो कांही कोणावर उपकार करतो या भावनेने नव्हे. तर आपल्या ठिकाणी असणारा बोध शिष्याचे ठिकाणी नांदलेला पहाण्यांत त्यांना अत्यंत आनंद आहे. त्यामुळें अशी बैठक होते. तेथें मी-तूंपणा रहात नाही. आणि त्या ठिकाणीं जो व्यवहार घडतो तो केवळ प्रेमाचाच घडतो. म्हणून भगवान म्हणतात 'अनन्यगतिक मेटला कीं माझें कोड पुरते म्हणून मला अनन्यभक्त पाहिजे असे फार फार वाटते. माझ्याशी जे दुजेपणाने वागतात, परकेपणाने वागतात, त्यांची मला गोडी नाहीं. आपल्या स्वार्थासाठी भक्ती करणारे रगड सांपडतील. पण ज्यांना केवळ मीच पाहिजे असे अनन्यभक्त मला अत्यंत दुर्मिळ आहेत.'

भगवान अत्यंत प्रेमपडिभराने व कृपेने जे बोधबीज पेरूं इच्छित असतात त्याकरिता अर्जुनाची भूमी ही चांगली मशागत केलेली दिसून आली. म्हणून येथे बीजारोपण केलें तर वाया जाणार नाहीं हें त्यांनीं पूर्वी सर्वसामान्य उपदेश करून चांगलें हेरून घेतलें होते. आता अर्जुन त्यांच्या परीक्षेत चांगल्याप्रकारें उत्तीर्ण झाला असल्याने भगवान अर्जुनाला म्हणत आहेत—

मुडाहुनि बीज काढिलें। तें निर्वाळलिये भूमीं पेरिलें।
तरि तें सांडीं विखुरी गेलें। म्हणों ये काई ॥ ३९
यालागीं सुमनु आणि शुद्धमति। जो अनिंदकु अनन्यगति।
पैंगा गौप्यही परी तयाप्रती। चाळविजे सुखे ॥ ४०

उत्तमबीज चांगल्या सुपीक भूमींत पेरतांना सुजाण शेतकऱ्याला जो आनंद होईल तोच आनंद भगवंतांना झाला आहे. आणि अठराव्या अध्यायांत पुन्हा गुह्यतम ज्ञान सांगतांना तितक्याच प्रेमभरानें उपदेश करीत आहेत.

गीतेंतील सारभूत सिद्धांत सांगण्यापूर्वी त्याची प्रस्तावना भरपूर झाली आहे. तथापि तो सिद्धांत नीट समजण्यासाठीं त्याची पार्श्वभूमी ही देखील नीट लक्षांत घेतली पाहिजे. आणि येथें या पार्श्वभूमीलाच अत्यंत महत्त्व आहे. ती पार्श्वभूमी योग्य नसेल तर सिद्धांत जसा समजावा किंवा अनुभवगम्य व्हावा तसा तो होणार नाहीं. बौद्धिक दृष्टिकोनांतून फक्त त्याचें बहिरंगदर्शनच होऊं शकेल.

अठराव्या अध्यायांतील या श्लोकापर्यंत गीतेंत अनेक प्रसंगीं विवेचनाच्या ओघांत अनेक प्रकारचा उपदेश केला गेला आहे. अनेक साधन मार्गांचेहि विवेचन आलें आहे, प्राचीन अशा अनादिसिद्ध ज्या दोन निष्ठा-कर्मयोग व ज्ञानयोग यांवर भरपूर विवेचन झालें आहे. कर्मयोगाला बुद्धियोग हें नवीन नामकरण योजून प्राचीन कर्मयोगाचे स्वरूप भक्तिप्रधान केलें आहे. अध्याय ९ आणि १२ यांमध्यें भक्तीचें वर्णन या दोनहि योगांपेक्षां आगळ्या महत्त्वानें वर्णन केलेलें आहे. आणि कर्मयोगांतर्गत अष्टांगयोगाचेंही वर्णन आलें आहे.

अठराव्या अध्यायातील वरील श्लोकापर्यंतचा संपूर्ण विचार सिंहावलोकन करून दृष्टिक्षेपांत आणल्यास पुष्कळच मुमुक्षूंची व साधकांची मोठी चमत्कारिक अवस्था होण्यासारखी आहे हें भगवंतांनी ओळखले आहे. आता आपण नेमकें काय करावें हें ज्यांना समजणार नाही आणि त्यांतील कांही गोष्टी तर आवाक्या-बाहेरच्याच आहेत असें ज्यांना वाटेल, त्यांच्याकरितां कांहीं अगदी निश्चयात्मक सांगणें भगवंतांना आवश्यक झालें. परमार्थाची विविध अंगोपांगे हीं अवि-रोधाने जेथें एकत्र येतील असेंच सारभूत विवेचन येथें करावयाचें आहे.

आतां यावर कोणी म्हणेल कीं जर सारभूत विवेचन गीतेंतील या दोन श्लोकांतच सांगतां येणें शक्य होते तर मग एवढें मागील विवेचन कशासाठी केलें ! याचें उत्तर असें आहे कीं हें गुह्यतम तत्त्वज्ञान नीट आकलन होण्यासाठीं

मागे वर्णन केलेल्या अनेक सिद्धांताची तात्त्विक बाजू नीट लक्षांत आली असेल तरच हें गुह्यतम ज्ञान अंतरंगांत नीट ठसूं शकेल. एरव्ही नाहीं.

या श्लोकांच्या पार्श्वभूमीचे महत्व हें थोडक्यांत असें आहे. वरील विवेचनात मागील पार्श्वभूमीचें स्वरूप प्रसंगोपात्त अधिक स्पष्ट केलें जाणार असल्याने तत्संबंधीचा विचार येथें अधिक न करतां श्लोकांच्या संबंधीच्या समग्र विचाराला प्रारंभ करूं या. येथें आपण जो विचार करणार आहोंत तो फक्त ज्ञानेश्वरीचे आधारानेंच करणार आहोत. कारण आपलें समाधान होईल असें निश्चित दर्शन त्यातूनच घडणार आहे.

श्लोकाचा अन्वयार्थ—**मन्मना भव**—तू माझ्यामध्येंच ज्याचे मन आहे असा हो—**मद्याजी भव**—माझेंच यजन पूजन करणारा हो—**मां नमस्कुरु**—मलाच नमस्कार कर. **ते सत्यं प्रतिजाने**—मी तुला सत्य प्रतिज्ञा करून सांगतों कीं—**मां एव एष्यसि**—तूं मला येऊन पोचशील. **मे प्रियः** असि—कारण तूं मला प्रिय आहेस.

या श्लोकांतील मन्मना भव याचा प्रथम विचार करूं. तूं माझ्यामध्येंच ज्याचें मन आहे असा हो. हा अर्थ सरळ व सोपा वाटतो. परंतु वस्तुतः तो तितका सोपा नाही. भगवंत कोण, त्याचें स्वरूप काय हें जाणूनच त्याचें भजन झालें पाहिजे. कारण—

**'मातें नेणोनि भजन । ते वायांचि गा आने आन ।**
**म्हणोनि कर्मांचें डोळे ज्ञान । तें निर्दोष होआवें ।**

न जाणतां केलेले भजन म्हणजे वायांचि आणि आने आन म्हणजे व्यर्थ आणि भलतेंच कांहींतरी होईल. गीतेंत दुसऱ्याच अध्यायांत 'शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्' म्हणून अर्जुन भगवंताला शरण गेला होता. परंतु भगवंताचें वास्तविक सत्य स्वरूप न जाणतां झालेली ती शरणागति भगवंतांना मान्य झाली नाही म्हणून अठराव्या अध्यायांत शरणागति कशी असावी ते स्पष्टपणे सांगताना आपण कोण तें त्यानी प्रथम सांगितलें आहे. आणि नंतरच शरणागति

कशी पाहिजे तें सांगितले आहे. येथें भगवंतांनी आपण असें कोणाला म्हणतो तें स्पष्ट केलें आहे. त्यांत भगवंतांनी बाह्य डोळ्यांनी दिसणाऱ्या रूपाला मी असें म्हटलें नाहीं. पहा—

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ १८।६१**

येथें भगवान् सर्वभूतमात्रांच्या हृदयामध्यें जो ईश्वर आहे तोच मी असे म्हणत आहेत. आणि पुढील श्लोकांत **'तमेव शरणं गच्छ'** त्यालाच सर्व भावानें शरण जा असें म्हणत आहेत. या उलट —

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**

यांत मला शरण जा असें म्हणत आहेत. एकदां त्याला शरण जा तर एकदां मला शरण जा असें हे दुटप्पी वर्णन कां? आपल्या हृदयांतील परमेश्वराला शरण जावे का मूर्तिमंत अशा भगवंताला शरण जावें असा संभ्रम यांतुन उत्पन्न होतो.

याचा स्पष्ट उलगडा होण्यासाठी आपणाला १० व्या अध्यायाकडे दृष्टिक्षेप करणें अत्यावश्यक आहे. तेथें या प्रश्नावर अधिकच प्रकाश पडेल.

पुढील लेखांत याचा विचार करूं.

# माझा एक दिव्य अनुभव

लेखक पी. एस्. भुजबळ, कोयना

दिनांक २३।४।७० हा दिवस महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी संघाने सामुदायिक रजेवर जाण्याचा ठरवला होता. सर्वांनी रजेवर जाण्याचा निर्णय घेतला व तशी सर्व कर्मचाऱ्यांच्या मनाची तयारीही झाली. पण इकडे माझ्या मनाची स्थिती काय तर श्रीसाईबाबांनी मला सारखे आंतून नेहमी जसे आत्म-ज्ञान देतात तसे सारखे 'तूं रजेवर जाऊ नकोस, फॉर्म भरूं नकोस.' असे सारखे मनांत आंदोलन चालवले होते, मन सारखे दोलायमान होत होते, काय करावे. सर्व समाजाला कसे डावलावे असा सारखा विचार येत होता. शेवटी अगदी मनाचा हिय्या केला व कांहीं लोकांचे सूचनेवरून अर्ज दिनांक २२।४।७० रोजी दुपारी २-१० वा. भरून ठेवला व मग मी विभागीय कार्यालयांत कामाला गेलो. पण कामात लक्ष लागेना. दुपारी ४-३० चे पुढे सारखा मानसिक त्रास देऊन श्रीसाईबाबा सारखे आत्मज्ञानाने सांगू लागले "अर्ज परत घे" मी कांही निर्णय घेईना, तसेच बळजबरीने काम करीत होतो. पण सारखा भास होऊन त्रास होऊं लागला. शेवटी ५-१५ वा माझे पूर्वीचे अर्ज दिलेल्या कार्यालयांत गेलो व अर्ज परत घेतला, मनाचें दोलायमान कमी झालें व मी घरी आलो.

संध्याकाळी ८-३०ची वेळ म्हणजे श्रीसाईबाबांची पूजा, आरती, जप वगैरेची वेळ. त्यावेळी पूजा करीत असतांनाच श्री. बाबांनी अर्ज फाडून टाक-ण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणे अर्ज फाडून टाकला. पूजा, आरती, जप संपल्यानंतर श्रीसाईबाबांची पुन्हा आज्ञा घेण्याचें ठरवले. दोन चिठ्ठ्या टाकून होय की नाही असे लिहून एक चिठ्ठी अगदी तन्मयतेने त्यांना सांगून उचला-वयाची व त्या चिठ्ठींत जी आज्ञा असेल त्याप्रमाणे प्राण गेला तरी वागणें चुकवावयाचे नाही असा माझा नेहमीचा शिरस्ता असे. आजपर्यंत मी त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागत आलों आहे. त्यामुळे पुष्कळ अडचणीतून अगदी सहीसला-

मत पार पडलो आहे. त्याप्रमाणे दोन चिठ्या अगदी सारख्या आकाराच्या केल्या कोणताही फरक दिसूं दिला नाहीं. एका चिठ्ठीत "रजेचा फॉर्म भर" दुसऱ्या चिठ्ठीत "रजेचा फॉर्म भरू नकोस" झालें. चिठ्याच्या सारख्या घड्या केल्या उदबती, उदी, लावून घोळून श्रीबाबांचे नांवाचा जप करून तळमळीने त्यांचे फोटोपुढें चरण कमलाजवळ टाकल्या व डोळे झाकून विश्वासानें त्यांना आग्रहाने विनंती करून तुम्ही सांगाल तोच निर्णय मानीन असें म्हणून चिठ्ठी डोळे झाकून उचलली, त्यांचे चरणांस लावली व उघडून पाहिली तर" **रजेचा फॉर्म भरूं नकोस**" अशी निघाली आणि श्रीसाईबाबांना नमस्कार करून मनाचा निर्णय कायम केला.

## दिनांक २३ एप्रिल १९७० कसोटीचा क्षण

नेहमीप्रमाणे सकाळी दहा वाजता श्रीसाईबाबांना वंदन करून उदी लावून त्यांना सांगितले कीं मी तुम्ही सांगितल्याप्रमाणे फॉर्म भरत नाहीं व कामावर जात आहें. तर रस्त्यांत कोणीही अडवितां कामा नये व उदी फुंकली व नेहमीचेच रस्त्याने ऑफिसला गेलो आणि काय चमत्कार! रस्त्यांत कोणीही अडवले नाही. अगदी आनंद झाला व समाधानात मी ऑफिसात आलो व श्री श्रीसाईबाबांना वंदन करून कामास सुरवात केली. पण एवढ्यावरच श्रीबाबा थांबले नाहीत. आज तर त्यांना माझ्या भक्तीची व निष्ठेची कसोटीच पहावयाची होती असे दिसते. ११,३० वा. ४।५ कर्मचारी माझेकडे आले व मला फॉर्म भरण्यास अगदी मानहानीचे शब्द वापरून दबाव आणून फॉर्म भरून घेण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु मी त्याना वरील श्रीसाईबाबांची आज्ञा मला मोडता येणार नाहीं, तुम्ही माझे वाटेल ते करा व मला ठार मारा, वाटल्यास जाळून टाका, असे सांगितले. तरीही त्यानी मला पुष्कळ दम भरले, पण माझ्या डोळ्यांपुढें फक्त श्रीबाबांचा आदेशच होता. त्या आदेशापासून मी प्राण घेतला असता तरीही ढळणार नव्हतों. एकदा बाबांनी शब्द दिला आणि तो मी मानला नाहीं अशी घटना माझ्या १५ वर्षांचे भक्तीत कधींच झाली नाही. पुढे पुन्हा एक कर्मचारी माझेकडे आला व म्हणाला की बाबांनी आम्हाला तुम्हास बांगड्यांचा आहेर देण्याचा आदेश दिला आहे. मी स्पष्ट म्हणालों "काहीं हरकत नाहीं. माझी तयारी आहे." असे म्हणतों तोंच १०० ते १५० कर्मचारी लोकांचा जमाव माझे ऑफीसचे बाहेर जमा झाला व त्यांचे पुढाऱ्याने मला

पुन्हा अर्ज भरण्याबद्दल दम भरला; पण त्यांना पुन्हा पुन्हा अगदी कळकळीने तेच तेच सांगितले पण त्यांचा का असल्या गोष्टीवर विश्वास बसतो! त्यांनी मला बाहेर नेलें व पुन्हा तेच प्रश्न विचारून फॉर्म भरण्यास सांगितलें. त्यावेळी एवढ्या प्रचंड जमावापुढे मी अगदी धीरोदात्त व उत्स्फूर्तपणें माझा कायमचा निर्णय सांगितला व मला उभे पेटवून दिले तरी मी फॉर्म भरणार नाहीं असें स्पष्ट बजावले. ही वेळ दुपारी १२-१५ ची म्हणजे शिर्डीला श्री साईबाबांचे आरतीची वेळ. माझ्या अंगात पूर्णपणे बाबांचा संचार झाला होता. मला त्यावेळी कोण काय बोलतो ते समजत नव्हते, मी पूर्णपणे भारून गेलो होतो. इतक्यांत कोणी तरी एका कर्मचाऱ्याने माझ्या खिशांत दोन हिरव्या रेशमी बांगड्या टाकल्या. त्या कोणी टाकल्या तेही मला समजलें नाहीं. इतका मी भारावून गेलो होतो. फक्त एकच ध्येय म्हणजे बाबांची आज्ञा मोडावयाची नाहीं ही माझी निष्ठा पाहून व मी काही बदलत नाहीं असें पाहून जमाव सूर्याजी पिसाळाचे नांवाने घोषणा देवून अयशस्वी माघारीं गेला व मी ऑफिसांत परत कामात मग्न झालों व दिलेल्या बांगड्या ऑफिसातच बाबांपुढे ठेवल्या. त्याच वेळी त्यानी मला आत्मज्ञान दिलें कीं "बांगड्या उद्या शुक्रवारी कोयना नदीस अर्पण कर"

संध्याकाळी ५-४५ वा. मी खोलीवर परत आलो तर जमावाने माझे दाराला दोन बांगड्या बांधल्या होत्या. त्या मी सोडतांच खाली पडल्या, पण त्यांतली एकही बांगडी फुटली नाहीं. श्रीबाबांचे पुढे त्या ठेवल्या व नमस्कार केला. रात्री पूजा करून सकाळी कोयना नदीत भक्तिभावाने मातेची पूजा करून व तिला वंदन करून त्या बांगड्या अर्पण केल्या मी समाधान पावलो. बाबांनी माझी कसोटी पाहिली व तीस मीही पूर्णपणें उतरलों असे आत्मज्ञान झाले.

**तात्पर्य**—थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे मी फॉर्म भरला नाही म्हणून कांही मोठा फायदा होणार आहे असा अर्थ नाही. महाराष्ट्रात श्रीसाईबाबांचे भक्त असलेले कितीतरी सरकारी नोकर असतील पण बाबांना माझी मानहानी होऊनही हा दबतो किंवा जमावाला भिऊन माझी आज्ञा मोडतो की काय, हीच त्यांना माझी परीक्षा पाहावयाची होती एवढाच त्याचा अर्थ.

# श्रीसद्गुरु साईनाथ महाराज यांचा पोवाडा

( शाहीर खाडिलकर, एम्., ए. बी. टी. )



नम्रपणानें लीन होउनी नमितो सद्गुरुचरणाला ।
साईबाबांनीं पुनीत केलं कैक भूवरी भक्तांला ॥ धृ० ॥

( १ )

शिरडी गांव झाले पुनीत । साईबाबा संत विख्यात होते जीवन्मुक्त जगतांत । चमत्कार केले अद्भुत ॥ जी ॥ निराकार निरंजन संत । आलं ब्रह्म सगुण मूर्तीत ॥ जी० ॥ चाल ॥ शिरडीला चमत्कार केला सांगतो तुम्हांला ॥ योग्यांच्या लीला अद्भुत गूढ सर्वांला ॥ साईबाबा मागती तेल दिवे लावायला ॥ दुकानदार देती तेलाला । पण रोज किती देणार बोला ? । मनिं म्हणती एकमेकाला । हा कोण गुसाई आला । अन् त्रास देतो आम्हांला । एके दिवशीं महाराज गेले तेल मागायला ॥ जी ॥ पण वाणी लोक बोलले त्यावेळा । "महाराज, तेल संपलं, करावं काय बोला ।" तंवा महाराज चालले मशिदीला । अन् मशिदीच्या सभोवाराला । पणत्या ठेवल्या जागोजागेला । आंत काकडे ठेवले झरझरा । पण तेलाचा नव्हता एक थेंबही त्याला हो जरा ॥जी०॥ लोक जमले मजा बघायला । लोक म्हणती एकमेकांला । "अहो पहा ह्या वेडा पीर आला । तेलाशिवाय दिवे लावायला तयार झाला । दिव्यावीण अंधार कधि कोणी दूर केला ?" बीजावीण झाड कसं येईल बोला हो बोला ? "विस्तवानं कुणी पेटवलं पाणी कधी बोला ?" वांझेच्या मुलाचा कुणी सोहाळा केला ? डोळ्याविण बघतो हा खुळा ? कानावीण कोण ऐकणारा ? । जिभेवीण कोण चाखणारा ? । असला हा अचरट वेडा पीर झाला । नानासाहेब डेंगळे तंवा बोलले कुटाळ लोकांला ॥ "जरा आवरा जीभ यावेळी । काय करतात तें पाहुद्या जरा । अन् मग काय हवं तें बडबडा । योग्यता कुणाची अशी नव कोणाला ?" "चाल" तेलांत घालुनी पाणी । पणत्यात ओती तो मौनी ॥ जी ॥ सारी रात्र दिवे जाळोनी । थक्क केले लहानथोर त्यानीं ॥ जी ॥ चाल ॥ डोळ्याविण दिसतं योग्याला । कानावीण ऐकणं योग्याला । जिभेवीण

चाखणं योग्याला। तो देतो प्रकाश लोकांला। सार्यप्रकाश ज्योत तोच झाला। ज्याला कुणीना प्रकाश देणारा। त्याला बंधन कसलं हो बोला? ॥ चाल ॥ तो चमत्कार पाहून। ग्रामस्थ गेले शरण ॥ जी ॥ सारे बोलले हात जोडून। क्षमा करा आम्ही हो दीन ॥ आम्ही तुमची लेकरें लहान। ध्या पदरीं थोर होऊन" ॥ जी ॥

२

साईबाबांची शय्या कशी होती सांगतों तुम्हांला ॥ फळी लाकडी लहानशी त्यांचा बिछाना झाला ॥ रुंदी एक वीत, चार हात होती लांबीला ॥ जी ॥ ॥ चाल ॥ चिंध्या बांधुनी चौबाजूंनीं फळी टांगली मशिदीला। वरती झोपती समाधि लावुन योगी साईनाथ त्या काळा ॥ जी ॥ निराधाराला आधार कसला जन्ममरण नाहीं ज्याला। संचित उरलेले भोगाया दैवबळें जन्मा आला ॥ जी ॥ वजन दहा शेर पुरेल जेथें खास फळी मोडायला। त्या फळीवरती साईनाथ मुनि खुशाल घेती झोपेला ॥ जी ॥ उशापायथ्याला दिवे लावुनी योगबळानें निद्रेला। साई सद्गुरु झोपी जाती आत्मानंदी रमण्याला ॥ जी ॥ चाल ॥ हें खोटं वाटलं कैकाला। म्हणून जन चालले रात्रीं पाहायला। तो खराच प्रकार हा झाला। कीर्ति चालली गावागावाला। लोकांच्या झुंडीच्या झुंडी जात बघण्याला ॥ खेंचावे भुंगे कमळा मध नेण्याला ॥जी॥ कस्तुरी कशी झांकेल? वास दरवळला ॥ जी ॥ सूर्याचा उदय राहील लपुन कां बोला? ॥ तसा तो ज्ञानसूर्य प्रगटला। अज्ञाननाश करण्याला हजारो लोक जमु लागले रोज त्या स्थळा ॥ जी ॥ सद्गुरु भजनरंगांत दंग जाहला ॥ जी ॥ सद्गुरु करती विचाराला । ही एक उपाधीच झाली मला। असे म्हणून त्यानी त्या फळीचा चुराडा केला ॥ जी ॥ चाल ॥ साईबाबा महा थोर संत। किती करती नवस अनंत ॥ जी ॥ झाले शिरडी गांव महाक्षेत्र । जशी काशी दुसरी पवित्र ॥ जी ॥ पुष्पाचा वास मातीस। मातीस मोल मग खास ॥ जी ॥ सोन्याची अंगठी चिंधीत। चिंधीला मोल मग येत ॥ जी ॥ कस्तुरी लाकडी पेटींत। पेटीला मोठेपण देत ॥ ॥ जी ॥ चाल ॥ तसं शिरडीगाव झाले क्षेत्र भाववन्ताला। भाववंत तोच भाग्यवंत जगीं तर झाला ॥ कैक भक्त येत त्या जागीं पूजेअर्चेला ॥ जी ॥ धन्य धन्य साईबाबा वंद्य झाले जगताला ॥ जी ॥ २ ॥

# शिरडी येथील श्रीरामनवमी उत्सव

(शके-१८९२)

श्रीसच्चिदानंदसद्गुरु श्रीसाईबाबा महाराज शिर्डी यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबादप्रमाणें दिनांक १४।४।७० पासून दिनांक १६।४।७० पर्यंत तीन दिवस श्रीसाईबाबांचे समाधीमंदिरांत साजरा झाला. उत्सवाच्या तयारी-करितां एक महिना अगोदर मे. रिसीव्हर साहेब ( श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी ) यांचे देखरेखीखाली खातेप्रमुखांची सभा घेऊन सर्व कामाचा व खर्चाचा विचारविनिमय करून प्रत्येक खातेप्रमुखास कामाची योजना ठरवून कोणी काय काय काम करावयाचे हे ठरविण्यांत आलें.

त्याप्रमाणें मांडवाचें काम, ( पिण्याचे ) पाणपोई काम, संरक्षण विभागाचे काम, साफसफाईचें काम, नवीन तात्पुरते नोकर–तीन दिवस उत्सवानिमित्त नेमणेचें काम, दिवाबत्ती लाऊडस्पीकर–व्यवस्था, कलाकारांची संभावना, वाजंत्री, बँड, चौघडा, अल्पोपहार व्यवस्था, इतर देखरेख ठेवणेचे काम सर्व व्यवस्था ठरल्याप्रमाणे झाली.

उत्सवाचा कार्यक्रम दिनांक १४।४।७० मंगळवार रोजी नित्यकार्यक्रमा-व्यतिरिक्त श्रींचे फोटो व ग्रंथाची पहाटे मिरवणूक गुरुपादुकामार्गे श्रींची द्वारका-माईत भव्य चांदीचे सिंहासनावर स्थापना व अखंड ग्रंथपारायणास प्रारंभ व भक्तांचें सामुदायिक पूजा अभिषेक, प्रसादरूपानें कापडविक्री, दुपारी श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले पुणें यांचे कीर्तन, रात्रौ श्रींचे रथाची गांवातून मिरवणूक, भजन, गारूड, भारूड वगैरे.

दिनांक १५।४।७० रोजी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे द्वारका-माईत अखंड ग्रंथपारायण समाप्त करून मिरवणुक गुरुपादुकामार्गे श्रीमंदिरात आली. त्यानंतर कावडी मिरवणूक कावडीपूजन व त्या समाधीवर समर्पण, भक्तांच्या सामुदायिक पूजा अभिषेक नंतर ११ वाजतां श्रीराम जन्म कीर्तन श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले पुणें यांचें, सायंकाळी निशाणाची व रथाची मिरवणुक, प्रसादरूपानें कापड विक्री. रात्रौ कलाकारांच्या हजेऱ्या, रात्रभर

जागर, मंदिर भक्ताना दर्शनासाठी खुलें. कलाकारांच्या हजेरीत कोपरगावचे सुप्रसिद्ध आकाशवाणी कलाकार श्री. नरोडे भजनीमंडळ यांना मुद्दाम आमंत्रण देऊन पाचारण केलें होतें. त्या प्रमाणें त्या भजनीमंडळाने तीन तास उत्तम संगीत निरनिराळ्या रागरागिणींत सुरेख भजनें म्हणून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर श्री. न्हन्नेबाबू चव्हाण हे माणिकप्रभु संस्थानचे गवई यानी दीड तास गायन व हार्मोनियम वादन फारच बहारदार केले. त्यानंतर कलाकारांनी पहाटे सहा वाजेपर्यंत गायन भजन केलें. एकूण २८ कलाकारांनीं श्रींपुढें हजेरी दिली. त्या सर्वांना साईसंस्थानतर्फे एक रुपया व नारळ प्रत्येकीं प्रसाद म्हणून देण्यांत आला.

दिनांक १६।४।७० गुरुवार रोजी नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांच्या सामुदायिक पूजा, अभिषेक, व नंतर श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले पुणें यांचे गोपाळकाला कीर्तन, दहींहंडी होऊन उत्सव समाप्त झाला. उत्सवांत तीन दिवस भक्तांना नेहमींचे दरांत मिष्टान्न भोजन, संस्थान भोजनगृहामार्फत देण्यात आलें. यांतील मिष्टान्नाचा खर्च संस्थाननें केला. तसेच सर्व संस्थान-नोकर, सेवेकरी, सन्माननीय पाहुणे यांस लाडू, चिवडा, अल्पोपहार संस्थेतर्फे देण्यांत आला. उत्सवास पुणें, मुंबई, वऱ्हाड, मराठवाडा, मद्रास, म्हैसूर वगैरे ठिकाणाहून बरेच भक्त आले होते. श्रीरामनवमीचे दिवशी रात्रौ शोभेचे दारूकाम झालें.

---

## शिरडी-वृत्त

### मे-जून १९७०

या महिन्यांत बाहेरगांवच्या भक्तांची गर्दी बरीच झाली, याचे कारण मे-ची सुट्टी, साकोरी उपासनीमहाराज जन्मशताब्दी उत्सव व लग्नसराई यामुळे शिर्डीस भक्तांची दर्शनार्थ फारच गर्दी झाली होती. कांही कलाकारांनी श्रींपुढे हजेरी दिली. ती खालील प्रमाणेंः—

## कीर्तन

श्री. ह. भ. प. गंगाधरशास्त्री बिडकर मु. बीड, मराठवाडा, श्री. ह. भ. प. सदाशिव कृष्ण पुराणिक. मु. आळंदी, जि. पुणे, श्री. मराठे. सं. गवई यांची नेहमीप्रमाणे कीर्तनें झाली.

## गायन

श्री. आर्. एन्. पराडकर मुंबई, श्री. प्रभाकर म्हार्दोलकर मुंबई, श्री. मधुकर नांदुरकर मुंबई, श्री. शांताराम पालकर मुंबई, श्री. सी. पटाळकर मुंबई, श्री. जाधव मुंबई, श्री. विठ्ठलराव हरिभाऊ उल्हे. अमरावती, विदर्भ, श्री. मास्टर अमीचंद घाटकोपर, मुंबई.

## प्रवचन

श्री. गणपत बापुराव भावे. दादर, मुंबई.

## तबलावादन

तबलाकेसरी. श्री. मुरली महाराज, मुंबई.

## सरोदवादन

श्री. ब्रिजनारायण, मुंबई.

## नवलविशेष

साकोरी येथील श्रीसद्गुरु उपासनी महाराज जन्मशताब्दी महोत्सवा-निमित्त कन्याकुमारी हस्तें श्रींचे समाधीस महापूजाभिषेक करण्यांत आला व साकोरीहून पालखी भजनी दिंडी येऊन नंतर साकोरी येथील शताब्दी उत्सवास प्रारंभ करण्यांत आला.

## अर्थमंत्र्यांचें आगमन –

या (मे) महिन्यांत शिरडी येथें महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री ना. शेषराव वानखेडेसाहेब, चॅरिटी कमिशनर श्री. गोडसे, कायदेमंडळाचे अध्यक्ष ना. पागे, श्री. आबासाहेब देशमुख वगैरे मंडळी श्रीसाईबाबांचे दर्शन घेऊन गेली.

## शिर्डी येथील हवापाणी –

यंदा येथें उन्हाळा बराच कडक होता. रात्रौ थंड वारा सुटत असे. सध्या पावसाळा आहे. हवेंत गारवा आला असून हवा उत्तम आहे. रोगराई कांहीं नाहीं.

**Books published and sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| (२) | ,, ( हिंदी ) | श्री. ठाकूर | ५–५० |
| (३) | ,, ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| (४) | ,, ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ५–२५ |
| (५) | ,, ( Kannad ) | N. S. Anantha Raum | ६–०० |
| (६) | A Glimpse of Indian Spirituality–by Pradhan | | १–५० |
| (७) | A Glimpse of Indian Spirituality ( Telugu ) | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत ( मराठी ) | श्री. आगास्करकृत | २–७५ |
| (९) | साईबाबा–अवतार व कार्य ( मराठी ) | श्री. धोंड | २–०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय ( मराठी ) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) | सगुणोपासना ( मराठी ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१२) | ,, ( गुजराथी लिपींत ) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) | कीर्तन पंचक ( मराठी ) | श्री. देव | १–५० |
| (१५) | शीलधी ( मराठी ) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि ( मराठी ) | कवि श्रीपाद | .००–१२ |
| (१७) | Guide to Shirdi ( English ) | | ००–१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली ( मराठी ) | | ००–२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 P. and 50 P. for No. 1. Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   P. O. Shirdi., Dist. Ahmednagar.

2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, 804 B Dadar, Bombay 14.